मंगळवार, २७ डिसेंबर २०२२
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१३०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 27 DECEMBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-130 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-08 ● PRICE-5

# अब्दुल सत्तारांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा

## अजित पवार यांची मागणी : गायरान जमीन प्रकरणी पदाचा दुरुपयोग



आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : सुप्रीम कोर्टाचा व राज्यसरकारच्या निर्णयाच्या सर्व बाबी समोर असताना एका व्यक्तीला त्यामध्ये फायदा मिळवून दिला आहे हा पदाचा दुरुपयोग आहे. ही बाब अतिशय गंभीर असून याप्रकरणाची जबाबदारी स्वीकारुन अब्दुल सत्तार यांनी आपल्या पदाचा तात्काळ राजीनामा दिला पाहिजे त्यांनी राजीनामा नाही दिला तर मुख्यमंत्र्यांनी त्यांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करावी अशी मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आज सभागृहात केली.**

परवा सभागृहात मुख्यमंत्र्यांनी एनआयटीप्रकरणात दिलेल्या निर्णयासंदर्भात चर्चा केली. परंतु आताच उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्याविषयी अत्यंत कडक शब्दात ताशेरे ओढले आहेत. त्यांनी पदाचा दुरुपयोग केला असे निरीक्षण नोंदवले आहे असेही अजित पवार म्हणाले. अब्दुल सत्तार हे महसूल राज्यमंत्री होते आणि आमच्या मंत्रीमंडळात एकनाथराव होते आणि तेच मुख्यमंत्री म्हणून कसे चालतात तुम्हाला सोयीचं चालतंय आणि नसेल ते आमच्यावर ढकला वा रे पठ्ठे... अशा शब्दात सत्ताधारी आमदारांनी केलेल्या वक्तव्याला अजित पवार यांनी उत्तर दिले.

मौजे घोडबाभूळ (जिल्हा वाशीम) येथील सरकारी गायरान जमीन गट नं. ४४ मधील ३७ एकर १९ गुंठे जमिनीचा हा घोटाळा आहे. हा घोटाळा दीडशे कोटीचा आहे. गायरान जमीनी कुणाला देता येत नाही. सुप्रीम कोर्टाचा निकाल आहे. त्याचे पालन आपण करत आलो आहोत असे असताना योगेश खंडारे यांनी जिल्हा न्यायालयात मागणी केली होती त्यांची ती मागणी फेटाळून लावली. जिल्हा न्यायालयाने योगेश खंडारे यांचा या जमिनीवर कोणताही अधिकार नसताना तो ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत होता. सरकारी गायरान जमीन हडपण्याचा त्याचा इरादा होता असे निरीक्षण कोर्टाने नोंदवल्याचे अजित पवार यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.



**महाविकास आघाडीचे आमदारांची वेलमध्ये जोरदार निदर्शने**

राजीनामा द्या राजीनामा द्या अब्दुल सत्तार राजीनामा द्या ... अब्दुल सत्तार यांची हकालपट्टी झाली पाहिजे ... गायरान बेचनेवालों को जुते मारो सालों को ... ५० खोके एकदम ओके ... सत्ताराने घेतले खोके, सरकार म्हणतेय एकदम ओके ... वसुली सरकार हाय हाय ... श्रीखंड घ्या कुणी, कुणी भूखंड घ्या ... अशा घोषणा देत महाविकास आघाडीचे आमदार आक्रमक होत वेलमध्ये उतरत खाली बसून जोरदार निदर्शने केली. अब्दुल सत्तार यांच्यावर हायकोर्टाने गायरान जमीन प्रकरणात ताशेरे ओढले आहेत हा मुद्दा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सभागृहात उपस्थित केला. शिवाय माजी मंत्री आणि आमदार दिलीप वळसे पाटील आणि माजी मुख्यमंत्री व आमदार पृथ्वीराज चव्हाण यांनीही अब्दुल सत्तार यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

# नवसासाठी दिल्ली वाऱ्या

## एकनाथ शिंदेंच्या दिल्लीवाऱ्यांवर ठाकरेंची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बऱ्याच कालावधीनंतर आज विधीमंडळ अधिवेशनाला हजेरी लावून कामकाजात सहभाग घेतला. विधानपरिषदेत महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाचा प्रश्न मांडल्यानंतर त्यांनी बाहेर येऊन माध्यमांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारांशी बोलत असताना त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली भेटीवर टीका केली. एका बाजूला शेतकरी उघड्यावर सोडलेला आहे आणि दुसरीकडे मुख्यमंत्र्यांच्या दिल्ली वाऱ्या सुरु आहेत, असे ते म्हणाले.

ठाकरे पुढे म्हणाले, मुख्यमंत्री हिंदुत्व मानणारे आहेत. म्हणून ते वारंवार देव दर्शनाला जात असतात. त्यांना नवस बोलणं आणि नवस फेडणे यासाठी वारंवार दिल्लीला जावे लागते. आजचा दिवस गेला आहे म्हणून नवस फेडतो. उद्याचा दिवस नीट जावा म्हणून नवस करतो. म्हणूनच त्यांच्या दिल्लीवाऱ्या सुरु आहेत, पण यात महाराष्ट्राचे भले कुठे? आज सुद्धा ते दिल्लीला गेले आहेत. एवढ्या दिल्लीवाऱ्यात त्यांनी महाराष्ट्राचा सीमाप्रश्न का नाही मांडला? शेतकऱ्यांना मदत देण्याचा विषय का नाही मांडला? असे प्रश्न उद्धव ठाकरे यांनी



उपस्थित केले. यावेळी पत्रकारांनी संजय राऊत यांनी उल्लेख केलेल्या बॉम्बचे काय झाले? असाही प्रश्न उपस्थित केला. यावर बोलत असताना ठाकरे म्हणाले की, बॉम्ब बरेच आहेत. त्याच्या वाती काढल्यात, फक्त त्या पेटवायचा अवकाश आहे. पण सध्या आमच्यासाठी कर्नाटकमधील काही लाख मराठी माणसांचा विषय महत्त्वाचा आहे. सीमाभागातील मराठी माणसाचा अनेक वर्षांपासून पिढ्यानपिढ्या संघर्ष सुरु आहे. सीमाभागातील जनतेचा प्रश्न आज विधीमंडळात मांडल्यानंतर काही जण मला प्रश्न विचारत आहेत की, तुम्ही कधी लाठ्या काठ्या खाल्ल्या. कधी तुरुंगात गेलात. मला वाटते या गोष्टीला काही अर्थ नाही. तुम्ही जेव्हा (मुख्यमंत्री एकनाथ शिंदे) लाठ्या काठ्या खाल्ल्या तेव्हा तुम्ही आमच्यात होता. याचा अर्थ असा नाही की आता तुम्ही गप्प बसायचे. गप्प बसू नका, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केले.

# हिंदूंनी घरात शस्त्रे बाळगावीत : प्रज्ञा सिंह ठाकूर यांचे वक्तव्य

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** हिंदूंनी घरामध्ये शस्त्रे बाळगली पाहिजेत किंवा धारदार सुऱ्या तरी सोबत बाळगल्या पाहिजेत असं वक्तव्य साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी केलं आहे. कर्नाटकात हिंदू कार्यकर्त्यांच्या हत्येविषयी बोलताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. लव्ह जिहाद करणाऱ्यांना लव्ह जिहादसारखंच उत्तर दिले पाहिजे. आपल्या घरात हिंदूंनी शस्त्र बाळगलीच पाहिजेत असंही साध्वी प्रज्ञा यांनी म्हटले आहे. लव्ह जिहाद करणाऱ्यांना लव्ह जिहादसारखंच उत्तर दिलं पाहिजे. आपल्या मुलींवर संस्कार घडवा. आपल्या मुलींना गोष्टी समजावून सांगा. एवढंच नाही तर हिंदूंनी आपल्या घरांमध्ये हत्यारं बाळगली पाहिजेत. काहीही नसेल तर भाजी कापण्याच्या सुरीला धार लावून घ्या. स्पष्टच सांगते आहे की आपल्या घरातले चाकू, सुरे जे आपण भाजी कापायला वापरतो ते धारदार असले पाहिजेत. त्यांनी चाकू भोसकून आपल्या हर्षावर हल्ला केला. त्यांनी चाकू सुऱ्यांनी भोसकून बजरंग दल, भाजपा, भाजपा युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांचा जीव घेतला आहे. आता शस्त्रांना धार करण्याची वेळ आपली आहे. जर आपल्या घरातली भाजी व्यवस्थित कापली गेली तर आपल्या शत्रूची जीभ आणि त्याचं शीरही आपल्याला प्रसंगी कापता येईल. प्रज्ञा ठाकूर यांनी आपल्या भाषणात शिवमोगा येथील हर्षासह हिंदू कार्यकर्त्यांच्या हत्येच्या घटनांकडेही आपल्या भाषणात लक्ष वेधले. आपले रक्षण करायचे असेल तर हिंदूंनी घरात सुरी किंवा चाकू बाळगलेच पाहिजेत. आज भाजी कापण्यासाठी वापरली जाणारी ही साधने उद्या शत्रूला उत्तर द्यायला कामी येतील असेही प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी म्हटले आहे. आपल्या घरात घुसून कुणी हल्ला केला तर त्याला जशास तसे उत्तर देणे हा आपला अधिकार आहे, असेही प्रज्ञा ठाकूर म्हणाल्या. हिंदूंना त्यांच्यावर आणि त्यांच्या प्रतिष्ठेवर हल्ला करणाऱ्यांना प्रत्युत्तर देण्याचा अधिकार आहे. सारख्या घटना घडतात त्याला जशास तसे उत्तर द्या. त्यांच्याकडे (मुस्लिम समाज) जिहादची परंपरा आहे. त्यामुळेच ते लव्ह जिहाद करतात. प्रेम असले तरीही ते त्यातही ते जिहाद करतात. आपण (हिंदू) सुद्धा प्रेम करतो, आपण देवावर प्रेम करतो. प्रेम ही आपल्यासाठी चांगली भावना आहे, असेही प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी म्हटले आहे.

# देवाची करणी आणि झाडांतून निघतेय पाणी !!

## लखमापूरजवळील परिसरात गुलमोहराच्या झाडाला पाहण्यासाठी नागरिकांची उडाली झुंबड

आधुनिक केसरी न्यूज

बंडू खडांगळे

लखमापूर : दिंडोरी तालुक्यातील लखमापुर जवळील ओझरखेड कॉलनी जवळील गुलमोहरांच्या झाडांतून अखंड पाणी वाहात असल्याने पाणी पाहाण्यासाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊ लागल्याने तर्क-विर्तकांना उधाण आले आहे.

लखमापूर फाट्यापासून काही आंतरावर असलेली ओझरखेड कॉलनी जवळ रस्त्यांच्या कडेला एक गुलमोहरांचे झाड असून त्या झाडांच्या बरोबर मध्य भागातून पाण्याचा झरा वाहु लागल्याने नागरिकांनी पाणी वाहाते ही खबर कळताच पाणी पाहाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी करीत आहे. व झाडांतुन वाहाणा-या पाण्यांविषयी नागरिकांमध्ये चर्चेला एकप्रकारे उधाण आले आहे.


वणी महामार्गावर हा भाग येत असल्याने वर्दळ मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे ही बातमी वा-यासारखी परिसरात समजतांच पाणी पाहाण्यासाठी एक प्रकारे यात्रांच भरली. त्यामुळे अनेकांनी वेगवेगळ्या विचारांची उधळण केली.

याबाबत मिळालेली माहिती अशी की हे झाडांवर या जागेवर लावण्याअगोदर तेथून जमिनीतुन पाण्याची पाईपलाईन गेलेली आहे. काही कालांतराने या जागेवर हे गुलमोहर झाडांचे रोपन करण्यात आले. जसजसे हे झाड मोठमोठे होऊ लागले तसेतसे झाडाच्या मुळ्या जमिनीत जाऊ लागल्याने त्या पाईप लाईनला छेदत गेल्याने त्या मुळ्यांनी पाईपलाईन काही प्रमाणात तुटल्याने त्या पाण्यांला अन्य ठिकाणी मार्ग न मिळालेल्याने ते मुळी व्दारे झाडाच्या खोडांतुन ते पाणी झाडांतुन बाहेर पडत आहे. असे अनेक शेतकरी बांधवांनी सांगितले आहे.



नागरिकांनी अफावांवर विश्वास न ठेवता, कुठेतरी पाईपलाईन तुटल्याने पाण्यांला अन्य ठिकाणाहून जागा न मिळाल्याने ते पाणी मुळीव्दारे झाडांच्या खोडांतुन बाहेर पडत आहे. हे गुलमोहरांचे झाड जीर्ण स्वरूपांचे आहे. म्हणून पाण्यांचा प्रवाह त्यातुन वाहात आहे. तरी नागरिकांनी फावांवर विश्वास ठेवू नये.


**माजी आमदार धनराज महाले**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## ' तेच ते ... '

आधुनिक केसरी



बऱ्याच रसिकांना कविवर्य विंदा करंदीकर यांची ' तेच ते...' ही कविता माहिती असेल. खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा विंदा चाळीसगावला आले होते. त्यावेळी प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून ही कविता ऐकण्याचा योग आला होता. त्यावेळी मी लहान असल्याने त्या कवितेतला गहन अर्थ कळला नव्हता. पण आपल्या जीवनात त्याच त्या असलेल्या गोष्टी सारख्या कराव्या लागत असल्याने येणारा वैताग मात्र बालसुलभ मनाला कळला होता. आज विंदा असते तर अजून भरपूर विषय त्यांना या कवितेत भर घालायला मिळाले असते. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या निवडीवरून कदाचित त्यांना असे वाटले असते - तेच लोक, तीच निवड, तीच आवड तीच नावड तेच विषय तेच वाद, वक्तव्याचे गंभीर पडसाद तीच भाषणे, तेच हारतुरे तेच सत्कार त्याच शाली, तेच हॉल तीच पुस्तके, तेच स्टॉल कोरोनाच्या बाबतीत त्यांना वाटले असते - तोच व्हायरस तेच हाल, तीच लोकांच्या जगण्याची कमाल तोच मास्क तेच टास्क, सॅनिटायझर आणि रुमाल तेच लॉकडाऊन तेच क्वारंटाईन तीच नर्स तीच व्हॅक्सिन त्याच परीक्षा त्याच शाळा जगण्याचाच मोठा घोटाळा. असे अनेक विषय विंदांनी हाताळले असते. विंदांची कविता मानवी जीवनातील असहायतेवर कोरडे ओढते. वास्तव समोर आणते. ( म्हणूनच आपल्याला नाविन्याची ओढही असते. ) पण जाऊ द्या. तो आपला विषय नाही. आपण उगीचच गंभीरतेकडे चाललोय. आज मलाही थोडंसं विनोदी अंगानं तुम्हाला वास्तवतेकडे घेऊन जायचंय. थोडा वेळ आपली करमणूक व्हावी आणि ती होता होता थोडंसं भाषेच्या वापरातील आणि मानवी जीवनातील विसंगतीकडेही आपलं लक्ष वेधावं एवढाच माफक हेतू. जीवनात जशा त्याच त्या गोष्टी आपल्याला कराव्या लागतात आणि त्यांचा आपल्याला कंटाळाही येतो, तसाच आपण न कंटाळता त्याच त्या शब्दांचा वापर करत असतो. एखादं नाणं जसं वापरून वापरून गुळगुळीत व्हावं ( आता आपण नाणी फार कमी वापरतो तो भाग वेगळा ! ), वापरून वापरून नोटाही हुळहुळीत व्हाव्या तसे शब्द देखील वापरून वापरून गुळगुळीत ( पुन्हा तोच शब्द ! क्षमस्व ! ) होतात. **क्रमशः**



## आनंदी पहाट

## मूल्यशिक्षण व त्याचे मूल्य

आधुनिक केसरी

आपण आध्यात्मिक मूल्यांना शाळेतील शिक्षणाचा एक भाग होण्यासाठी प्रोत्साहित करु शकतो, कारण जर शालेय विद्यार्थ्यांना जीवनातील आध्यात्माचा उद्देश स्पष्ट केला गेला तरच ते अधिक चांगले शिकतील. या मूल्याचा समावेश करून, आपण विद्यार्थ्यांचे मन, शरीर आणि आत्म्याच्या



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सुदृढतेत, सक्षमतेत वाढ घडवून आणता येऊ शकते; ज्यामुळे त्यांचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास होऊ शकेल. व्यक्तीच्या प्रत्येक पातळीवर मूल्ये आणि आध्यात्माचे शिक्षण माणसाचे व्यक्तिमत्त्व समृद्ध करते, असे प्रकर्षाने जाणवते. जीवनशैलीतील ऐच्छिक साधेपणामुळे बराच खर्च वाचतो आणि एखाद्या व्यक्तीला त्याच्या संसाधनांमध्ये अन्यायकारक किंवा अप्रामाणिक मार्गाने भर घालण्याच्या मोहापासून संरक्षण मिळते. सत्य, शांती, प्रेम, नीतिमत्ता आणि अहिंसा ही मूल्ये सर्व प्रमुख आध्यात्मिक मार्गांमध्ये आढळतात, हे आध्यात्मिक मार्ग मानवी मूल्ये देखील आहेत आणि चैतन्यपूर्ण, निरोगी आणि व्यवहार्य कार्य करिअरची मूलभूत मुळे आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० च्या अनुषंगाने अभ्यासक्रमात नैतिक तर्क, पारंपारिक भारतीय मूल्ये आणि सर्व मूलभूत मानवी तसेच घटनात्मक मूल्ये (जसे की सेवा, अहिंसा, स्वच्छता, सत्य, निष्काम कर्म, शांती, त्याग, सहिष्णुता, विविधता) समाविष्ट करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. भारतीय संस्कृतीला एक समृद्ध आध्यात्मिक वारसा आहे, ज्याची मूळ नैतिक मूल्ये धर्मात खोलवर रुजलेली आहेत. हे नीतिमत्त्व चांगल्याचे स्वरूप समजून घेण्याचा आग्रह धरतात, नैतिक आदर्शांचा प्रत्यक्ष वापर करून परिपूर्णतेचे जीवन मिळविण्याचे व्यावहारिक माध्यम मांडतात. संस्कृतीला समृद्ध वारसा मिळवून देणारे शिक्षण हेच मूल्यशिक्षण आणि अध्यात्म होय.



आधुनिक केसरी

**थकली रे काया | संसारात ||**
काय करू देवा | आणीक सायास
मिटली रे आस | देहाची ह्या ||१||
मना लागे ओढ | तुझ्या चरणाची ||
मज पामराची | काकुळती ||२||
क्षुधा-तृष्णा सारी | हरपून गेली ||
भ्रांत ना उरली | तुजवीन ||३||
चिंतनी चिंतन | क्षणोक्षणी चाले ||
संदेह निमाले | अंतरीचे ||४||
धाव धाव आता | धाव विठुराया ||
थकली रे काया | संसारात ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## श्री चोखोबांची अभंगवाणी

आधुनिक केसरी

केधवां सुटेना ऐसे जाले जीवा।
गोवियेले देवा काही येथे॥
आता झडकरी धांवे लवकरी।
सोडवी बा हरि मजलागी॥
प्राण हा कंठी धरिला तुजसाठी।
निर्वाण दृष्टी पाहसी काय॥
चोखा म्हणे वांया चालिलासे वेळ।
आला असे काळ निकट दिसे॥


## नाम आणि प्रेम ही जुळी भावंडे आहेत



आधुनिक केसरी

साधारण प्रापंचिकाची ओढ विषयाकडे असते. आज सुख कशात आहे एवढेच तो बघतो, आणि विषयात तो इतका तल्लीन होतो की जगालाही तो तुच्छ मानतो. विषय शेवटी दुःखालाच कारणीभूत होतात हे तो विसरतो. विषय आणि मी एक होतो तेव्हा सुख होतेसे वाटते. पण वास्तविक, आजवर कुणालाही विषयाने शाश्वत सुख आणि समाधान मिळालेले नाही. असे सुख आणि समाधान मिळविण्यासाठी आपली वृत्ती भगवंताच्या ठिकाणी स्थिर ठेवणे हा एकच उपाय आहे. वृत्ती नेहमी एकाकार व्हावी, पण ती विषयात न होता नामात व्हावी, हेच सर्व संतांचे सांगणे आहे. 'मना'ला उलटे केले की 'नाम' हा शब्द तयार होतो. याचा अर्थ असा की, नाम घेणे म्हणजे मनाची विषयाकडे असलेली ओढ उलटी फिरविणे. नाम म्हणजेच 'न मम'. प्रपंच माझा नाही म्हणून करणे म्हणजेच नाम घेणे. मी जितकी प्रपंचाची काळजी घेतो तितकी नामाची घेतो का, याचा प्रत्येकाने विचार करावा. प्रपंचातले आपले कर्तव्य अगदी मनापासून केल्यावर, जी परिस्थिती निर्माण होईल तिच्यामध्ये अत्यंत समाधानाने राहून नामस्मरणात काळ घालवावा. निर्गुणाला एक जुळे झाले, ते म्हणजे नाम आणि प्रेम. दोन्ही एकमेकांना अतिशय चिकटून आहेत. एकाला धरले की दुसरे त्याच्यामागे येते. आज आपले प्रेम अनेक वस्तूंवर, व्यक्तींवर, पैशावर, विद्येवर, देहावर, लौकिकावर गुंतले आहे. त्या कारणाने, भगवंतावर प्रेम करून त्याच्यामागे नाम येईल अशी आपली अवस्था नाही. गोपींची तशी अवस्था होती. पण आपण नामाला वश करून घेऊ शकतो. ते झाले की भगवंताचे प्रेम आपोआप येईल. घरादारावर प्रेम सहवासाने बसते; मग नामाचा सहवास केला तर प्रेम का लागणार नाही ? खरोखर, या जगात कुणाच्या बुद्धीला पचविता आल्या नाहीत अशा कितीतरी वस्तू आहेत. मुलाला आपल्या बापाचे बारसे पाहाणे जसे शक्य नाही, तसे 'मी कोण आहे "' हे बुद्धीने ओळखणे शक्य नाही. खरी सत्य वस्तू कल्पना, बुद्धी, आणि तर्क यांच्या पलीकडे आहे. सत्याचा शोध करायचा असेल तर सत्य ज्याने झाकले आहे ती वस्तू दूर करा, म्हणजे सत्य दिसेल. सत्य हे आपल्याला उत्पन्न करता येत नाही; पण उपाधी मात्र उत्पन्न करता येते. उदाहरणार्थ, भिती, कल्पना इत्यादि आपणच उत्पन्न करतो. नदीच्या पुलावर उभे राहिले असता पायाला पाण्याचा स्पर्श न लागता देखील, वाहणाऱ्या पाण्याची मजा अनुभवता येते; त्याचप्रमाणे भगवंताचे सत्यत्व ज्याच्या अंतःकरणाला पटले, तो विषयामध्ये राहून देखील, होणाऱ्या सुखदुःखाच्या गोष्टींकडे गंमत म्हणून बघेल आणि त्यापासून स्वतः अलिप्त राहील. **आजचे बोधवचन आहे** - सुख हे विषयात नसून आत्म्यात आहे. आत्मा सुख-रूप आहे.

## मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

***जया चक्षुने लक्षिता लक्षवेना।***
***भवा भक्षिता रक्षिता रक्षवेना।***
***क्षयातीत तो आक्षै मोक्ष देतो।***
***दयादक्ष तो साक्षिने पक्ष घेतो।।१७४।।***

**श्लोकार्थ :-** परमात्मवस्तु चर्मचक्षुने पाहण्याचा प्रयत्न केला तर पाहता येत नाही. ज्ञानचक्षूने तिचे दर्शन झाले की दृश्य विश्व विलीन होते. त्याचे रक्षण करू म्हटल्यास ते करता येत नाही. आत्मा स्वतः अक्षय असल्यामुळे त्याचे दर्शन अक्षय मोक्ष देतो. तो दयाळू तर खराच परंतु केवळ साक्षीपणाने तो आत्मज्ञानी पुरुषाचा सांभाळ करतो. **विवेचन :-** सर्वदूर आणि सर्वत्र भरून राहिलेला परमात्मा आपल्याला आपल्या डोळ्यांनी पाहता येतं नाही. आंधळ्या मनुष्याला अजिबातच डोळे नसतात असे नाही तर त्या डोळ्यांच्या मागून पाहणारे चैतन्याचा लोप झालेला असतो असे म्हणता येईल. आपण नारळाचे उदाहरण याआधीही पाहिले आहे. सुका झालेला नारळ आणि ओला नारळ याता बाह्य बाजूंनी विशेष फरक नसतो, परंतु आतून त्यातील पाणी (अहंभाव) सुकलेला असतो. संत सुद्धा असेच असतात. त्यांचा अहंकार पूर्णपणे नष्ट झालेला असतो. त्यामुळे भवरोग त्यांना बाधत नाही. नश्वर जगात राहून इथले सर्व नियम पाळून ही ते भगवंताच्या चरणी नित्य रत असतात. जगद्गुरू तुकाराम महाराज म्हणतात,

"आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाला सोहळा अनुपम्य ॥१॥ आनंदे दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग जाला ॥२॥एकदेशीं होतों अहंकारें आथिला । त्याचा त्यागें जाला सुकाळ हा ॥३॥ फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझ्या संकोचें दुरी जालों ॥४॥ नारायणें दिला वस्तीस ठाव । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥५॥ तुका म्हणे दिलें उमटोनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनियां ॥६॥"

(अर्थः-मी माझ्या स्वतःचे मरण स्वतःच्या डोळ्याने पाहिले व तो सोहळा फारच अनुपम्य आहे. त्रीभुवनामध्ये आनंद दाटला गेला आहे आणि सर्वत्र आत्मभाव निर्माण झाल्यामुळे आनंदाचा भोग प्राप्त झाला आहे. माझ्या ठिकाणी देहाभिमान निर्माण झाला त्यामुळे मी संकुचित झालो होतो आता देहाभिमानाचा त्याग केल्यामुळे सर्वत्र सुकाळ झाला आहे. आता जन्म मरणाचे सुतक फिटले मी माझ्या संकुचित बुद्धी मुळे हरी पासून दूर झालो होतो पण नारायणानेच त्याच्या ठिकाणी आश्रय दिला व मी माझा भक्तिभाव नारायणाच्या चरणावर ठिकाणी ठेवून राहिलो आहे. तुकाराम महाराज म्हणतात मी माझ्या परमार्थिक मरणाचा प्रकार आपल्या अंगी लावून घेतला व अनुभवला आहे मगच या सर्व जगाला माझा अनुभव मी सांगत आहे.) अशा प्रकारे तयार झालेल्या साधकांला संसार बाधत नाही. प्रपंचात राहूनही तो साधक पाण्यात कोरडे राहणाऱ्या कमल पत्राप्रमाणे प्रपंच करतो. ह्या अर्थाचा श्लोक आधी येऊन गेला आहे. जसे त्रिमिती चित्रपट पाहण्यासाठी वेगळा आणि विशिष्ठ चष्मा लावावा लागतो, तद्वतच परमात्मा पाहण्यासाठी वेगळी आणि विशिष्ठ दृष्टी लागते, ती दृष्टी साधकाला साधनेने आणि गुरुकृपेने प्राप्त होते.

"आवघीया चत्वार मुक्ती । वेदशास्त्रें बोलती । तयांमध्यें तीन नासती । चौथी ते अविनाश ॥"
भगवंत अशा साधकांना अलौकिक देत असतो. असा साधक सायुज्य मुक्तीचा अधिकारी होतो असे समर्थ सांगतात. अशा भक्तांच्या रक्षणाची सर्वोतोपरी काळजी भगवंत वाहतो.

दूध चांगले असतेच, पण दुधाचा संपर्क जर दह्याशी (सद्गुरु)आला तर, त्यानंतर क्रमानी होणारी दही, ताक, लोणी आणी तूप ही स्थित्यंतरे दुधाचे स्थितीजन्य अस्तित्व नष्ट करणारी असली तरी खऱ्या अर्थाने दुधाचे मूल्य आणि गुण वाढविणारी असतात. ताक, लोणी, तूप, किंवा बासुंदी, श्रीखंड हे सर्व पदार्थ दुधाचेच असतात, पण त्यातील अमुक एक भाग म्हणजे दूध असे सांगता येत नाही. एका अर्थाने ज्ञान पूर्णपणे मुरते, अंगभूत होते आणि मग ते वेगळे होत नाही किंवा दाखविता येत नाही. संत सामान्य मनुष्याला असे बनवितात. थोडक्यात साधक सगुण आणि निर्गुण यांच्या पलीकडे गेलेला असतो. "आत्मा निर्गुण निरंजन । तयासी असावें अनन्य । अनन्य म्हणिजे नाहीं अन्य । आपण कैंचा तेथें ॥"

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

# खंडाळा ग्रामसेवकाचा अजब कारभार; 8-अ देऊन फेरफार देण्यास नकार

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल त्रिभुवन**

**वैजापूर :** तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत खंडाळा येथे एक अजबच प्रकार समोर आला असून ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत हद्दीतील एका नागरिकांस 8 अ चा उतारा दिल्यानंतर फेरफार प्रमाणपत्र देण्यासाठी टाळाटाळ करत अप्रत्यक्ष नकार दिला आहे. सविस्तर माहिती अशी की खंडाळा येथील ग्रामपंचायत मध्ये ग्रामस्थ लताबाई त्रिभुवन यांनी वैयक्तिक कामासाठी काही कागदपत्रे काढण्यासाठी अर्ज केला होता या अनुषंगाने ग्रामपंचायत कडून 8 अ चा उतारा व इतर कागदपत्रे मिळाली पण फेरफार प्रमाणपत्र देण्यास खंडाळा ग्रामपंचायत चे ग्रामविकास अधिकारी एम बि ढाकणे यांनी टाळाटाळ केली व फेरफार प्रमाणपत्र देण्यास नकार दर्शविला यात त्यांनी जागेचा फेरफार झाला आहे का म्हणतं आमच्याकडे नोंदणी आहे का नाही हे बघावे लागेल असे म्हणतं टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केला परंतु प्रश्न असा की मग त्यांनी 8 अ प्रमाणपत्र कश्याच्या आधारे दिले? फेरफार झाल्यावरच 8 अ व साताबारा प्रमाणपत्र मिळत असते ये संबंधित अधिकाऱ्यांना माहिती नव्हते का? कोणत्या पुराव्याच्या आधारे त्यांनी 8 अ प्रमाणपत्र दिले व फेरफार देण्यास टाळाटाळ का केली चक्क फेरफार प्रमाणपत्र वर सही शिक्के मारून प्रमाणपत्र स्वतःच्या खिशात खातले या प्रकारात अप्रत्यक्ष पणे आर्थिक अपेक्षा तर अधिकारी यांनी ठेवली नसावी ना हा जिज्ञासा चा विषय आहे. संबंधित ग्रामस्थाने घरी जाऊन रजिस्ट्री चे कागदपत्रे आणून दाखविल्या नंतर अधिकार्यांने फेरफार प्रमाणपत्र देऊ केले. मग संबंधित अधिकारी यांनी फेरफार नसताना 8 अ चा उतारा अगोदर दिलाच कसा?

ग्रामविकास अधिकारी ढाकणे हे औरंगाबाद या ठिकाणाहून अपडाऊन करत असून प्रवासामुळे कदाचित कामात असा प्रकार घडला असावा. प्रसासकीय अधिकारी यांनी मुख्यालयी राहण्याचे आदेश असताना या आदेशाला संबंधित ग्रामविकास अधिकारी यांनी केराची टोपली दाखवली असून ग्रामस्थांकडून ग्रामविकास अधिकारी यांनी गावातच राहिल्यास गावचा विकास चांगला साधता येईल व कागदपत्रे काढण्यासाठी अडचण निर्माण होणार नाही अशी मागणी दिसून येत आहे. बरेच अधिकारी हे मुख्यालयी न राहता अपडाऊन करतात हे प्रशासनास माहिती असूनही याबाबत प्रशासन झोपेचे सोंग का घेत आहे.

# नवा व्हायरस कसा वागू शकेल याची शाश्वती नाही

## सामाजिक शिस्त हाच उपाय : प्रसिध्द मानसोपचार तज्ञ डॉ. अविनाश जोशी यांचा आधुनिक केसरीशी संवाद

आधुनिक केसरी

**औरंगाबाद : जगाबरोबर भारतीयांनी कोरोनाच्या दोन भयावह लाटा अनुभवल्या आहेत. आता चीनमध्ये बीएफ-7 प्रकारातील विषाणूने खळबळ उडाली आहे. भारतात बऱ्यापैकी लसीकरण झालेले आहे. परंतू भीती आणि गैरसमजामुळे एकही डोस न घेतलेल्यांची संख्याही मोठी आहे. कोणत्याही आजारात लसीकरण हाच एकमेव उपाय असतो. भारतात या नव्या व्हेरीएंटचा परिणाम होणार नाही. परंतू नवा व्हायरस कसा वागू शकेल याची शाश्वती देता येत नाही. म्हणून काळजी घेतलेली बरी, असे मत प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ.अविनाश जोशी यांनी आधुनिक केसरी जवळ संवाद साधताना व्यक्त केले.**




कोरोनात सरकारी नियमांचे पालन करणे, मास्क वापरणे, सॅनिटायझर वापरणे, हात स्वच्छ धुणे याचबरोबर अनावश्यक गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळले पाहिजे. याआधी मॉल आणि गर्दीची ठिकाणे फिरायला जाणे आपल्या अंगलट आले आहे. अजूनही परिस्थिती तशी नाही. परंतु झपाट्याने याचा प्रसार होण्यास काहीच वेळ लागणार नाही. आपण सरकारी यंत्रणा,आणि शास्त्रज्ञांवर विश्वास ठेवून वर्तन करायला शिकले पाहिजे. ऐकीव गोष्टीवर भर देण्याची गरज नाही आणि जीव गेल्यावर रडण्यात अर्थ नाही, असे स्पष्ट मत डॉ. अविनाश जोशी यांनी मांडले. सध्या घाबरण्याची परिस्थिती नाही,परंतु घाबरण्याची परिस्थिती होऊ नये, यासाठी जनतेची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. मागे ज्यांना ज्यांना कोरोना झाला त्यांनी एकही डोस घेतला नसल्याचे आढळून आले. लसीकरण करून घेणे सद्यस्थितीत गरजेचे झाले आहे. कोरोनावर प्रभावी औषध नाही, सावधगिरी हाच उपाय आहे. मानसिक भिती, लॉकडाऊन, आर्थिक कोंडी, जीवन ठप्प होणे अशी परिस्थिती येऊ नये असे वाटत असेल तर सामाजिक शिस्तीचे पालन करण्याची महत्त्वपूर्ण गरज आज निर्माण झाली आहे, असे मत डॉ. अविनाश जोशी यांनी आधुनिक केसरीजवळ व्यक्त केले.




**डॉ . अविनाश जोशी यांचा महत्त्वपूर्ण सल्ला**

- घाबरण्याची परिस्थिती नाही तरी घाबरण्याची परिस्थिती होऊ नये यासाठी सामाजिक शिस्त पाळणे गरजेचे .
- कोरोनावर प्रभावी औषध नाही, सावधगिरी हाच उपाय .
- सरकारी यंत्रणा आणि शास्त्रज्ञांवर जनतेने विश्वास ठेवणे गरजेचे .
- मास्क, सॅनिटायझर आवर्जून वापरणे आणि अनावश्यक गर्दीत जाणे टाळावे .
- ऐकीव गोष्टीवर भर देण्याची गरज नाही . जे आपल्या हातात आहे त्याचा विचार करावा .



# ऑनलाइन सुविधेचा उपयोग करावा : तहसीलदार लाड

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** राज्य सरकार द्वारा दिलेल्या ऑनलाइन सेवा सुविधेचा लाभ घेऊन ग्राहकाने आपली कामे करून चांगली सेवा घेण्यासाठी आग्रह धरावा, असे प्रतिपादन प्रभारी तहसीलदार शंकर लाड यांनी राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या कार्यक्रमात व्यक्त केले. सोमवारी तहसील कार्यालय व अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या वतीने राष्ट्रीय ग्राहक दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी ग्राहक पंचायत जिल्हाध्यक्ष तथा ग्राहक संरक्षण परिषद सदस्य नानक वेदी यांनी प्रास्ताविकात ग्राहक कायदा बहाल करणारे स्व बिंदुमाधव जोशी यांच्या ग्राहक हितासाठी देण्यात आलेल्या संघर्षाची माहिती दिली तसेच ग्राहक आयोगात दाखल प्रकरणे निकाली काढण्यासाठी नव्याने नेमण्यात आलेल्या मध्यस्थता या विषयावर मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी मोबाईलवर अनावश्यक आलेली लिंक अथवा फसवे अमिषाला बळी पडू नये, असे आवाहन केले. यावेळी तालुका अध्यक्ष राम आहूजा, संरक्षण परिषद सदस्य रावसाहेब नाड़े, विष्णु सोनार, राम जमादार, शाम पंजवानी, उप कार्यकारी अभियंता कल्याण रंधे, वजन मापे निरीक्षक वानखेड़े, ओम बारड, सामाजिक कार्यकर्ते दिनेश पारिख यांनी ग्राहक हिताच्या सूचना व समस्या मांडल्या. यामध्ये पैठण बसस्थानकाची दुरावस्था व रात्री बसेस पैठण मार्गे उपलब्ध नसणे, महावितरणद्वारा अंडरग्राउंड केबल काम अर्धवट करणे, वजनमापे विभाग द्वारा कैम्प लावणे आदी मागण्या होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन तालुका संघटक विष्णू ढवळे यांनी तर आभार नायब तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांनी मानले. कार्यक्रमासाठी नायब तहसीलदार गिरजाप्रसाद आवळे, पुरवठा निरीक्षक सतीश पेंडसे, राजेश शिंदे,प्रदीप गायके, बालाजी कांबळे, प्रसाद खिस्ति,पठाड़े, अशोक गलांडे, के. आर. निकम,परमेश्वर बोबडे, लक्ष्मीकांत पसारे आदी उपस्थित होते.

# हिवरखेडा (नां) तिरंगी लढतीत ग्रामपंचायत सरपंचपदी कांताबाई मगर

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** हिवरखेडा व नांदगीरवाडी या ग्रुप ग्राम पंचायतीत प्रथमच जनतेतून महिला सरपंच निवड आपल्या गटाची व्हावी म्हणून गावातील प्रमुख मंडळींनी चंग बांधला होता. त्यातच गावातील प्रमुख मंडळींनी ग्रामपंचायत बिनविरोध निवड करावी यासाठी प्रयत्न केले परंतु त्यास यश आले नाही.

यापूर्वी गावातून जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य तसेच सभापती, जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक, खरेदी विक्री संघ कन्नड संचालक अशी विविध पदे मिळवून गावकरी सतत तालुका व जिल्हा



राजकारणात गावचे नाव चर्चेत ठेवायचे. हिवरखेडा गावात स्व. अशोक मगर यांची पकड होती. यावर्षी त्यांच्या निधनानंतर पहिली. गावात सरपंच पदासाठी माजी पंचायत समिती सभापती स्व. अशोक मगर यांच्या भावजयी कांताबाई मगर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती राजू मगर यांच्या पत्नी सौ अनिता मगर यांचे दोन पॅनल तसेच अपक्ष उमेदवार समद पटेल यांच्या पत्नी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. गावातील भविष्यातील राजकारणाचे गणित या निकालावर अवलंबून असल्याने तिन्ही उमेदवारांनी जोरदार धुरळा उडवला. नुकत्याच विविध कार्यकारी सोसायटी निवडणुकीत राजू मगर यांचा समान मते मिळाल्या नंतर चिट्टीवर पराभव झाला होता त्यामुळे तालुका पातळीवर संधी मिळण्यासाठी त्यांनी निवडणूक जिंकण्याचा निश्चय केला होता. दोन्ही गटाच्या चुरशीत अपक्ष उमेदवार विजयी होईल अशी चर्चा होती परंतु धक्कादायकरित्या कांताबाई मगर 629 मते मिळवत विजयी झाल्या त्यांनी सभापती राजू मगर यांच्या पत्नीचा 44 मतांनी पराभव केला त्यातच अपक्ष उमेदवार 477 मते मिळाली. जनतेतून प्रथम निवडून आलेले माजी सरपंच शेकनाथ बडोदे यांनी यावेळी सदस्य पदासाठी त्यांच्या पत्नी यांना सदस्य पदासाठी उभे केले होते परंतु त्यांचा दारुण पराभव झाला.



# शेतकरीदिनानिमित्त हतनूर शाळेची निसर्ग सहल

आधुनिक केसरी न्यूज

**हतनूर :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा हतनूर ची'निसर्ग सहल' राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त परिसरातील कृषिभूषण शेतकरी संतोष जाधव यांच्या शेतात काढण्यात आली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना 'सेंद्रिय शेती''काळाची गरज आहे व पर्यावरण संतुलन राखण्यासाठी चे महत्व ब्रम्हा जाधव यांनी आपल्या स्वानुभवातून पटवून दिले आणि आपण ही आपल्या पालकांना सेंद्रिय शेती करण्यास सांगावे असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. तसेच सोलार ट्रॅप प्रेस कँटोल तगडी ही पर्यावरण पूरक किटनियंत्रक आहे ,त्यामुळे मित्र किडे सुरक्षित राहतात आणि शत्रू किडे रासायनिक फवारणी शिवाय सौरऊर्जेचा वापर करून नियंत्रित करता येतात याबाबत ही सविस्तर माहिती दिली. निसर्ग सहली साठी शाळेचे शालेय समिती अध्यक्ष संदीप केवट, मुख्याध्यापक भागवत कल्याणकर, शिक्षक सुरेश मोरे, गणेश जाधव, रत्ना आव्हाडे, उज्वला मानके, कमल गिरी, श्रीमती खान, स्वाती सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.



# बिहारमध्ये CBI सक्रिय

आधुनिक केसरी

बिहारमध्ये सत्तांतर होऊन एक महिना उलटताच सीबीआयकडून हालचाली सुरु झाल्या आहेत. माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्याविरोधातील जुने भ्रष्टाचाराचे प्रकरण सीबीआयकडून पुन्हा काढण्यात येत आहे. एक महिन्यापुर्वीच जनता दल युनायटेडचे नेते नितीश कुमार यांनी भाजपासोबत असलेले सरकार पाडून लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलासोबत सरकार स्थापन केले होते. युपीए वनच्या काळात लालू प्रसाद यादव यांच्याकडे रेल्वे मंत्रालयाची जबाबदारी होती. त्याकाळात काही रेल्वे प्रकल्पामध्ये अनियमितता झाल्याचा आरोप होऊन २०१८ मध्ये त्याची चौकशी सुरु करण्यात आली होती. विशेष म्हणजे मे, २०२१ रोजी सीबीआयनेच ही चौकशी बंद केली होती. जे आरोप करण्यात आले होते, त्यात कोणतीच केस होत नाही, असे त्यावेळी सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले होते. या प्रकरणात लालू प्रसाद यादव यांच्यासोबत त्यांचा मुलगा बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव, मुलगी चंदा यादव आणि रागिणी यादव यांचेही नाव घेतले गेले होते. युपीए वन सरकार असताना लालू प्रसाद यादव रेल्वे मंत्री असताना मुंबईतील वांद्रे येथील रेल्वेची जमीन भाडेपट्ट्याने देण्याचा प्रकल्प आणि दिल्ली रेल्वे स्थानकाची दुरुस्ती प्रकल्प देण्याच्या बदल्यात यादव यांना दक्षिण दिल्लीमध्ये एक प्रॉपर्टी मिळाली होती, असा आरोप करण्यात आला होता. ही प्रॉपर्टी खासगी विकासक डीएलएफ ग्रुपची असल्याचे सांगितले जाते, याच कंपनीला वांद्रे आणि दिल्ली येथील प्रकल्पाचे काम मिळाले होते. मात्र आता सत्तांतर होताच सीबीआयकडून या प्रकरणाची पुन्हा एकदा चौकशी करण्यात येणार आहे. एक महिन्यापूर्वीच जेडीयू नेते नितीश कुमार यांनी भाजपावर त्यांचा पक्ष फोडण्याचा आरोप करत वेगळा रस्ता निवडला होता. भाजपासोबतचे सरकार पाडून त्यांनी आरजेडीशी युती केली होती. सीबीआयने लालू प्रसाद यादव यांच्याविरोधातील प्रकरण पुन्हा काढल्यामुळे देशभरात पुन्हा एकदा राजकीय खडाजंगी पाहायला मिळू शकते. भाजपाकडून केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर होत असल्याचा आरोप आधीपासूनच होत होता. आता या प्रकरणामुळे विरोधकांना केंद्र सरकार आणि भाजपावर टीका करण्याची आयती संधी मिळाली आहे.

# आंदोलने, नेते.. यशाचे रहस्य !



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**सामजिक प्रश्नांवरून सर्वच देशात अनेक चळवळी,आंदोलने होतात.त्यातील काही यशस्वी होतात.तर काही अयशस्वी.. म्हणजे फुसका बार! या यशापयशाची कारण मीमांसा नेमकी काय असते? कोणते मुद्दे, कोणते गुणधर्म आंदोलने यशस्वी करतात?स्वातंत्र्य पूर्व काळात सगळी आंदोलने,चळवळी या गुलामी विरोधात, इंग्रज राज्य कर्त्यांच्या विरोधात होत्या.मार्ग (जहाल,मवाळ),वेगळे असले तरी प्रत्येकाचे ध्येय मात्र एकच होते – स्वातंत्र्य!**

स्वातंत्र्य मिळाल्या नंतर लोकांच्या अपेक्षा वाढल्या. त्यामुळे आंदोलनाचे स्वरूप देखील बदलले. सगळेच प्रश्न एकसुत्री नव्हते. त्यात विविधता होती. मंडल आयोग, अयोध्या,नर्मदा, हिजाब, वेगवेगळ्या जाती साठी आरक्षण, साबरमला ,शनी शिंगणापूर मंदिर प्रवेश,किसान समस्या,नागरिकत्वाचे नवे कायदे, माहितीचा अधिकार, भोंग्याचे आवाज..अशी अनेक उदाहरण देता येतील. त्यातील काही यशस्वी झाली. काही फसली. आंदोलन हे नेहमी नेत्या भोवती फिरते. त्याला जाती, धर्म, पक्ष याचे आवरण असले तरी नेतृत्व कुणाचे हे जास्त महत्वाचे. या लेखात अशा नेतृत्वाच्या तीन महत्व पूर्ण गुणाचा उल्लेख करायचा आहे. अभ्यास, संशोधना द्वारे या तीन प्रमुख गुणाचे महत्व अधोरेखित झाले आहे.

Agitator,Innovator, Orchestrator म्हणजे चळवळ्या,नाविन्याचा ध्यास घेतलेला, अन् संयोजनाची चांगली जाण असणारा नेता,हीरो असला तर बहुधा आंदोलन यशस्वी होते. आंदोलनाचा उद्देशच जुने त्यागून काळाला सुसंगत नव्याचा स्वीकार असे असते. कोणताही समाज,कोणतेही सरकार, कोणतेही व्यवस्थापन अशा क्रांतिकारी बदलाला सहसा तयार नसते. त्यामुळे समाजात जो असंतोष आहे, असमाधान आहे त्यामागची कारण परंपरा शोधून, नेमके काय बदल हवे आहेत, ते कसे करायचे, कुणी करायचे याचा स्पष्ट आराखडा नेत्याकडे असणे गरजेचे. म्हणजे त्या सर्व अंगाचा, परिणामाचा अभ्यास हवा. ने आहे ते नको, ते बदलायचे, तर त्याजागी काय हवे, हे अपेक्षित बदल कसे घडवून आणायचे हे समाधान, सोलुषन नेत्याकडे हवे. बदल एकांगी करता येत नाही. सर्व सहमतीनेच बदल घडविता येतात. म्हणजे तुमचे मुद्दे सर्व संबंधितांना पटवून देता आले पाहिजेत. जे जसे चालले आहे ते तसे यापुढे चालणार नाही असे समजावून,ठणकावून सांगता आले पाहिजे. जी समस्या आहे ती कुणा एकट्याची नाही, ती अनेकाशी, किंवा बहुसंख्यांक लोकाशी निगडित आहे हे पटवून देता आले पाहिजे.

नाविन्याचा ध्यास घेणारा नेता संभावित अडी अडचणी चा अभ्यास करतो. त्याला मार्गावरील खाच खळगे ज्ञात असतात. तो वेगवेगळे पर्याय शोधतो. ते पर्याय कसे योग्य आहेत, सर्वांच्या फायद्याचे आहेत हे समजावून सांगतो..त्यासाठी सर्वांची मदत घेतो. कारण चळवळी संबंधीचा हा प्रवास समूहाचा असतो. त्यासाठी विषयाची सखोल समज हवी. अभ्यास हवा. पाठीशी दांडगा अनुभव हवा. वाकचातूर्य हवे. या कुशल नेत्याला नवे भविष्य,नवा समाज घडवायचा असतो. परंपरेने चालत आलेले नीती नियम बदलणे,त्यासाठी मन वळविणे हे एक व्रत असते.त्यासाठी साधनेचीच गरज असते. एरवी चळवळ फसते. चळवळीचे संयोजन, नियोजन देखील तितकेच महत्वाचे.आपण सुचविलेले उपाय, मार्ग हाच कसा उत्तम पर्याय आहे, सर्वांच्या भल्याचा आहे हे दोन्ही पक्षी गळी उतरविता आले पाहिजे. संगीत संयोजक जसे सर्व वादकांना एका ताला सूरात बांधून ठेवतो तेच काम या नेत्याला करायचे असते. चळवळ जशी फोफावते, पसरते, तशी त्यात गुंतागुंत निर्माण होत जाते. काही अनपेक्षित गोष्टी घडतात.आंदोलनाला वेगळे,विपरीत वळण लागू शकते. या सर्व शक्यतांचा विचार नेत्याला करावा लागतो. भविष्याचा अंदाज घ्यावा लागतो. आंदोलनात सहभागी सर्वांना बरोबर घेऊन वाटचाल करणे, घुसखोर मंडळीपासून सावध राहणे, आंदोलन बहकणार नाही हे डोळ्यात तेल घालून बघत राहणे, ही तारेवरची कसरत असते नेत्यांसाठी. इनोवेशन शिवाय आंदोलन म्हणजे पर्याय न देता समस्येचे निरर्थक उत्तर शोधीत बसणे.नावीन्यपूर्ण कल्पना पण नियोजन, संयोजन शून्य म्हणजे परिणाम न साधणारी फोल कल्पना! एकूण काय आंदोलनकर्ते नेते समाजाला बदल घडवून आणण्याची गरज समजावून सांगतात. त्यानंतर ती समस्या सोडविण्याचे विविध पर्याय, शक्यता पडताळून बघतात.संयोजकांचे काम आपल्या जवळील उपलब्ध माहिती मुद्देसूद स्वरूपात सर्व पक्षापुढे ठेवणे. हे समस्येचे समाधान पाल्हाळ स्वरूपात नसावे. ते प्रॅक्टिकल असावे. अमल बजावणीसाठी सोयीचे असावे. कायद्याला नियमांना धरून असावे. सरकार किंवा व्यवस्थापनाला अडचणीत आणणारे नसावे. प्रस्थापित व्यवस्था भविष्यातील चांगल्या साठी बदलणे, त्या बदलासाठी नावीन्य पूर्ण पण प्रॅक्टिकल, पर्याय सुचविणे अन् या पर्यायाच्या अमल बजावणीसाठी संयोजन, नियोजन करणे, मुख्य म्हणजे सर्वांच्या सोयीचे समाधान होईपर्यंत पाठपुरावा करणे, या सर्व कार्यात सर्व समावेशक धोरण बाळगून सर्वांना बरोबर घेऊन वाटचाल करणे हे यशस्वी आंदोलनाचे आधारस्तंभ म्हणता येतील. यात चुका होणारच. सारे काही मनासारखं घडणार नाही. आपण दिलेल्या पर्यायाचा विपरीत परिणाम, निगेटिव्ह इम्पॅक्ट होऊ शकतो. कागदावर सारे छान असेल पण अमलात आणायचे तर अनेक अडचणी येऊ शकतील. प्रवासात मूळ उद्दिष्ट भरकटू शकते. भविष्या विषयीचे अंदाज चूकू शकतात. वातावरण स्वच्छ न राहता गढूळ होऊ शकते. गुणवत्तेशी तडजोड करावी लागते. दुधात पाणी मिसळल्या सारखे सारे गढूळते. अशावेळी नेतृत्व सावध असावे लागते. या नेतृत्वाला तीन ठिकाणाहून बळ मिळत असते. एक व्यक्तिगत स्वतःच्या करिष्म्याचे बळ. दुसरे सत्तेचे किंवा अधिकाराचे बळ. अन् तिसरे त्याच्या मित्रांचे, नात्याचे, ओळखी पाळखीच्या बड्या व्यक्तीचे बळ.. कुशल नेता ह्या सर्वाचा यथायोग्य उपयोग करून घेतो आंदोलनाच्या वाटचालीत. अनेकाचे तर सारे आयुष्य खर्ची जाते चळवळीत.. नेते होणे सोपे असते. पण समाजाचे असली हीरो होणे तेव्हढेच कठीण! सगळ्याच लोखंडाचा परीस होत नाही!



# राजकारणात आत्मपरीक्षण करण्याची वेळ



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**राष्ट्रीय जीवनाशी निगडित आदर्शांशिवाय लोकशाही राजकारण शक्य नाही. संविधान रचणाऱ्यांनी संपूर्ण राजकारणाचे चित्र उभे केले आहे. संविधानात अनेक संस्था आहेत. त्याचा आदर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. संसदीय लोकशाहीमध्ये राजकीय विचारधारा पक्षांद्वारे व्यक्त केल्या जातात. निवडणुकीत एखाद्या पक्षाला किंवा गटाला बहुमत मिळते. त्यांना पाच वर्षे काम करण्याचा घटनात्मक अधिकार आहे. विरोधकांनी सरकारवर टीका करावी. विरोधकांना सरकारवर टीका करण्याचा अधिकार आहे, टीका वस्तुस्थितीदर्शक आणि जनहितासाठी प्रेरित असावी.. टीका ही वस्तुस्थितीदर्शक आणि जनहिताला चालना देणारी असावी. तथ्यहीन टीका वातावरण बिघडवते. यामुळे अनावश्यक तणाव निर्माण होतो. देश नेहमीच तणावाखाली असतो. असे लोक देशाला विकास मोडीत येऊ द्यायचे नाहीत. हे गंभीर प्रश्न आहेत. राजकारणासाठी आत्मपरीक्षण करण्याचा हा प्रसंग आहे.**

परंतु काही काळापासून शासनाच्या अधिकाराला आव्हान दिले जात आहे. विधिमंडळाने पारित केलेले कायदेही रद्द केले जात आहेत. घटनात्मक लोकशाहीसाठी ही परिस्थिती भयावह आहे. नीती आयोगाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी या निराशाजनक राजकारणाबद्दल दुःख व्यक्त केले आणि प्रत्येक लहान-मोठ्या घटनेचे राजकारण केले जात असल्याचे सांगितले. सरकारांचे प्रत्येक काम मतांच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. पटनायक म्हणाले की, परिपक्व लोकशाहीत निवडून आलेल्या सरकारला जनहितासाठी काम करण्याची संधी मिळालीच पाहिजे.

भारतातील किरकोळ घटनांचे राजकारण हिंसक आंदोलनात रूपांतरित होत आहे. यामुळे भारतातील वातावरण खरोखरच चिंताजनक बनत आहे. छोट्या छोट्या घटनांचेही इथे राजकारण केले जाते. अशा राजकारणाला हिंसक आंदोलनाचे स्वरूपही येते. कायदा व सुव्यवस्था बिघडते. भारताची जागतिक प्रतिष्ठा, समृद्धी आणि आत्मनिर्भरता या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा आहेत. सर्वांना बरोबर घेऊन सर्वांचा विकास हा पंतप्रधान मोदींचा अजेंडा आहे, मात्र पंतप्रधानांच्या प्रतिष्ठेचीही येथे दखल घेतली जात नाही. पंतप्रधानांच्या सन्मानाचे आणि अधिकाराचे औचित्य साधून डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत म्हणाले होते, 'पंतप्रधान हे मंत्रिमंडळाच्या इमारतीचा पाया असतात. जोपर्यंत मंत्रिमंडळाला असे अधिकार दिले जात नाही तोपर्यंत त्याची जबाबदारी निश्चित होणार नाही. कल्पनेचे राजकारण करणे आश्चर्यकारक आहे. काही काळापूर्वी काल्पनिक सहिष्णुतेचा प्रचार केला जात होता. नकारात्मक राजकारणाचे समर्थक भारतात अराजक माजवत आहे.परराष्ट्र धोरणावरही नकारात्मक भाष्य केले जात आहे. चिनी सैन्याच्या माघारीचे पुरावे काय? नकारात्मक मोहिमेमुळे राफेल तसेच बोफोर्स तोफांवर बेजबाबदार विधाने झाली. पाकिस्तानवरील सर्जिकल स्ट्राईकवरूनही भारताची बदनामी करणारी वक्तव्ये करण्यात आली. जागतिक आरोग्य संघटनेनेही भारत सरकारच्या कोरोना महामारीवरील कामाचे कौतुक केले आहे. जग कौतुक करतंय, पण इथे कधी लसीबद्दल तर कधी लॉकडाऊनच्या वेळेबद्दल शंका उपस्थित केल्या जातात.

भारतातील राजकारण आणि राजकारणाचा विकास प्राचीन काळापासून आहे, ब्रिटिश संसदेचा जन्म नंतर झाला. प्राचीन काळीच येथे राजकारण आणि राजनीती विकसित झाली होती. ब्रिटिश संसदेचा जन्म आणि विकास नंतर झाला. ऋग्वेद, यजुर्वेद यांना समृद्ध राष्ट्राची आकांक्षा आहे. राज्यसंस्थेचा हळूहळू विकास होत गेला असे अथर्ववेदात म्हटले आहे. प्राचीन राजवटीत राजा विधानसभेच्या समितीला उत्तरदायी होता. ऋषीमुनींच्या तपश्चर्येने राष्ट्राचा जन्म झाला. राष्ट्र आणि राजकारणाला जन्म देणारे हे ऋषी खरे तर त्या काळातील राजकीय कार्यकर्ते आहेत. इथे राजधर्म किंवा नीतिशास्त्राचा विकास किमान सहा हजार वर्षांपूर्वी सुरू झाला होता. कौटिल्याचे अर्थशास्त्र ख्रिस्तपूर्व ३४० वर्षांपूर्वीचे मानले जाते. कौटिल्याने आपल्या पूर्ववर्ती राजकीय विचारवंत बृहस्पती, शुक्राचार्य, भारद्वाज, पराशर इत्यादींचा उल्लेख केला आहे. स्तोत्रात उल्लेख आहे, 'नियुक्ती-पदोन्नती गुणवत्तेवर आणि कामाच्या आधारेच व्हायला हवी. जातीच्या किंवा कुळाच्या आधारावर नाही. जाती हा श्रेष्ठतेचा निकष नाही. प्राचीन भारतात राज्यशास्त्राला अनेक नावे होती. दंडनिती, अर्थशास्त्र आणि राजधर्म इत्यादी नावांनी ते ओळखले जात असे, परंतु सर्वात लोकप्रिय नाव नीतिशास्त्र होते. धोरण हे खरे तर राज्याचे धोरण असते. राजामध्ये सार्वजनिक संग्रह आणि नेतृत्वाची गुणवत्ता आवश्यक असल्याचे म्हटले आहे. जनतेला एकत्र आणणारा नेता असतो. गतिमान समाज हा पुरोगामी असतो. शुक्र नीतीनुसार राजाचा योग्य नेता न मिळाल्याने प्रजा आपत्तीच्या होडीत बुडते. महाभारत शांतीपर्वात समाजसेवा, व्यक्तिमत्त्व निर्माण, राष्ट्रनिष्ठा इत्यादी मूलभूत सांस्कृतिक घटक राजकारणाशी जोडले गेले आहेत. राज्य धोरण. राजामध्ये सार्वजनिक संग्रह आणि नेतृत्वाची गुणवत्ता आवश्यक असल्याचे म्हटले आहे. जनतेला एकत्र आणणारा नेता असतो. गतिमान समाज हा पुरोगामी असतो. शुक्र नीतीनुसार राजाचा योग्य नेता न मिळाल्याने प्रजा आपत्तीच्या होडीत बुडते. महाभारत शांतीपर्वात समाजसेवा, व्यक्तिमत्त्व निर्माण, राष्ट्रनिष्ठा इत्यादी मूलभूत सांस्कृतिक घटक राजकारणाशी जोडले गेले आहेत. राज्य धोरण. राजामध्ये सार्वजनिक संग्रह आणि नेतृत्वाची गुणवत्ता आवश्यक असल्याचे म्हटले आहे. जनतेला एकत्र आणणारा नेता असतो. गतिमान समाज हा पुरोगामी असतो. शुक्र नीतीनुसार राजाचा योग्य नेता न मिळाल्याने प्रजा आपत्तीच्या होडीत बुडते. महाभारत शांतीपर्वात समाजसेवा, व्यक्तिमत्त्व निर्माण, राष्ट्रनिष्ठा इत्यादी मूलभूत सांस्कृतिक घटक राजकारणाशी जोडले गेले आहेत. समाज व्यवस्था नीरस नाही. समाजाला एक संस्कृती असते. दृष्टी आहे. एक अर्थशास्त्र आहे आणि सर्व साध्य करण्यासाठी एक व्यावहारिक राजकारण देखील आहे. राजकारण हे संस्कृती आणि नैतिकतेच्या मर्यादेत राहिले पाहिजे. सजावटीची शिस्त संविधान आहे. संविधानात मूलभूत कर्तव्येही आहेत, पण ध्येय शून्य राजकारण समाज बांधणीच्या आदर्शावर आक्रमक आहे. शाहीन बाग, नागरिकत्व दुरुस्ती कायद्याचा निषेध, किसान आंदोलन हे मुद्दाम तिळाचे ताड केले गेले. मूलभूत प्रश्न असा आहे की कायदेशीररित्या निवडून आलेली सरकारे आपला अजेंडा जनहितासाठी का राबवू शकत नाहीत? अल्पसंख्याक आपला निर्णय बहुमताच्या सरकारवर कसा लादू शकतो? हे आदर्श राजकारण नाही. पंतप्रधानही अनेक प्रसंगी असेच बोलले आहेत. संकुचित राजकारणामुळे वातावरण बिघडते. सध्या भारतातील संपूर्ण राजकारण हे लांच्छनास्पद मानले जात आहे. त्यामुळे चांगल्या राजकीय कार्यकर्त्यांनाही योग्य तो मान मिळत नाही. म गांधी, लोहिया, डॉ बाबासाहेब आंबेडकर, दीनदयाल उपाध्याय यांनी सार्वजनिक जीवनाच्या मर्यादा आखल्या होत्या. लोहिया यांनी दीर्घकालीन राजकारण म्हणजे धर्म असे वर्णन केले होते. राष्ट्र उभारणीसाठी राजकारण ही दीर्घकालीन प्रायश्चित्त आहे. दोषाचा खेळ नाही. लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधक हे शत्रू नाही आता मात्र हेच वैर झाले आहेत अशा राजकारणाचा समाजावर वाईट परिणाम होतो. राष्ट्रीय चर्चेचे मुद्दे पार्श्वभूमीवर जातात. आर्थिक सुबत्ता नेहमीच राष्ट्रीय प्रवचनात असायला हवी. शिक्षण, आरोग्य, सुरक्षा आणि राष्ट्रीय एकता आणि अखंडता हे महत्त्वाचे मुद्दे आहेत. राजकारण करताना राष्ट्रीय पातळीवर हे मुद्दे कुठेतरी हरवत आहे. राजकारण्यांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) – समजून घेण्याची दिशा-दृष्टी



डॉ. मारोती तेगमपुरे
संपर्क क्र. ९४२३९९३१३७

आधुनिक केसरी

**के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील नवीन शैक्षणिक धोरणातील (२०२०) पाचवीपर्यंतचे मातृभाषेतून शिक्षण, तीन ते अठरा वयोगटाचा शिक्षण हक्क कायद्यांतर्गत करण्यात आलेला समावेश, शिक्षणावर सकल राष्ट्रांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्के खर्चाची भूमिका या खऱ्या अर्थाने नवीन शैक्षणिक धोरणातील जमेच्या बाजू म्हणाव्या लागतील. मुळात पाचवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून देण्यात येईल, असे या शैक्षणिक धोरणात म्हटले आहे, असे सर्वत्र म्हटले जात आहे. परंतु नवीन शैक्षणिक धोरणातील मूळ प्रस्तावात वेगळेच काहीतरी म्हटले आहे. ते म्हणजे 'जेथे शक्य असेल तेथे मातृभाषेतून शिक्षण दिले जाईल.' ही झाली एक बाजू. दुसरी बाजू अशी की, यापूर्वी १९६४- ६६ मध्ये कोठारी शैक्षणिक आयोगाने याविषयीची स्पष्ट मांडणी केलेली असून त्यामध्ये म्हटले आहे की, त्रि-भाषा सूत्राची अंमलबजावणी करून मातृभाषा, राष्ट्रभाषा आणि संपर्क भाषा (इंग्रजी) या भाषा मुलांना शिकवण्यात याव्यात.**

प्रथम पदवी पातळीपर्यंत मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असावे, याबरोबरच इंग्रजी ही संपर्क भाषा म्हणून शिकवावी.' इतकी स्पष्ट भूमिका असतानाही आजपर्यंत आपण काय, हा खरा प्रश्न आहे.

याच आयोगाने शिक्षणावर जीडीपीच्या ६ टक्के इतका खर्च केला पाहिजे असेही सांगितले आहे. म्हणजे सध्याच्या कस्तुरीरंगन यांच्या अहवालात काही वेगळं म्हटले आहे काय? नवउदारवादी भांडवलशाही चौकटी अंतर्गत शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट असे निर्माण केले जात आहे की, कॉर्पोरेटला गरज असेल त्या प्रमाणात लोकांना शिक्षित करणे आणि सार्वत्रिक शिक्षणाच्या आश्वासनावर विविध उपक्रमांद्वारे पळवाट शोधणे एवढेच आहे. नवीन शैक्षणिक धोरण म्हणजे काय? हे समजून घ्यायचे असेल तर या पळवाटा कोणत्या आणि त्यांची अंलबाजावणी कशी केली जाईल, हे अगोदर समजून घ्यावे लागेल.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) हे द्विवर्ण शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने एका व्यापक प्रयत्नाचाच भाग आहे. याप्रसंगी मला राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षणासंदर्भातील विचार आठवत आहेत. ते म्हणाले होते, "बहुजन समाजात ख-या ज्ञानाचा लोप झाल्याकारणाने देशाची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. विद्या कमी कमी होत गेल्याने व्यापार, उद्योग, कला कौशल्य याची अवनती होऊन देशाची फार दैना उडालेली आहे." शिक्षणाचे महत्व सांगताना शिक्षणामुळे वंचित समुहाची प्रगती व विकास होईल याउलट शिक्षणाच्या अभावाने काय दुष्परिणाम उद्‌भवू शकतात. हे महात्मा जोतीराव फुले यांनी एका अखंडात व्यक्त केले आहे. ते म्हणतात "विद्येविना मती गेली I मतीविना नीती गेली I नितीविना गती गेली I गतीविना वित्त गेले I वित्ताविना शुद्र खचले I इतके अनर्थ एका अविद्येने केले II"

तर सावित्रीमाई फुले शिक्षणाचे महत्व सांगताना म्हणतात की, "शूद्रांना सांगण्याजोगे आहे एकच मार्ग हा, शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हटते पाहा."

शिक्षणाचे महत्व समजावताना गाडगेबाबा म्हणतात की, "शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे निव्वळ धोंडा."

याबरोबरच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा याच पद्धतीने शिक्षणाच्या अभावाचे दुष्परिणाम सांगितले आहेत. त्यांच्या मते," शिक्षण व ज्ञानाच्या अभावामुळे व्यक्ती आणि समाजाचे फार मोठे नुकसान होते.निरक्षर व्यक्ती डोळे असून आंधळी असते. तीला इतरांवर अवलंबून राहावे लागते. इतरांचे हात धरून तिला जीवनाची वाटचाल करावी लागते." या महामानवांच्या विचारातून शिक्षणाचे महत्व अधोरेखित होते. देशातील सद्यस्थितीतील नवीन शैक्षणिक धोरण काही लोकसमुहासाठीच शिक्षण याच पायवाटेने जाणारे असून अधिकाधिक समूहांना शिक्षण क्षेत्राच्या बाहेर फेकण्याचे काम करणार असल्याचे स्पष्ट होते.

नवीन शैक्षणिक धोरण लागू करताना किंवा त्यांची घोषणा करताना देशाच्या संसदेमध्ये त्याची चर्चाही होऊ नये, हे खऱ्या अर्थाने दुर्दैवी आहे.

आज रोजी मोडकळीस आलेली अर्थव्यवस्था सावरणे, कोरोना महामारीस पायबंद घालण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करणे. आणि बेरोजगारीच्या उग्र होत चाललेल्या जटील समस्येवर मार्ग शोधणे अत्यंत आवश्यक असताना आम्ही नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याची तयारी करीत आहोत. शिक्षणासारख्या गंभीर मुद्यावर या संकटाच्या काळात आखणी करणे नक्कीच समर्थनीय नाही. मागील सहा वर्षांपासून अडगळीत पडलेला नवीन शैक्षणिक धोरणाचा मुद्दा आत्ताच घिसाडघाई करून का चर्चेत आणला गेला, यावर समाज म्हणून चिंतन होणे खऱ्या अर्थाने गरजेचे आहे. अशा संकटाच्या काळातही केंद्र सरकारला आपल्या विचारांची पेरणी करण्याची घाई झालेली दिसते. या नवीन शैक्षणिक धोरणाचे काही स्पष्ट ठळक पैलू आहेत. या धोरणामुळे शिक्षणाचे आणखी मोठ्या प्रमाणात बाजारीकरण, केंद्रीकरण होईल. एका बाजूस आत्मनिर्भर होण्याची 'भाषा' करायची व दुसऱ्या बाजूस नवीन शैक्षणिक घोरणाच्या माध्यमातून शंभर खाजगी विद्यापीठांना देशात येऊन शिक्षणाचा धंदा करण्यासाठी दारे खुले करायचे, असा हा एकूण विचार करायला भाग पाडणारा प्रकार आहे. दुसऱ्या बाजूस या अहवालात आरक्षण, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, समाजवाद याबरोबरच वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधान याचा ओझरता उल्लेख आहे. असं जर असेल तर या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून आपणास भारतीय राज्यघटनेस अभिप्रेत असलेली उद्दिष्ट्ये साध्य होणार आहेत काय? हा खरा कळीचा प्रश्न आहे.

भारतीय राज्यघटना आम्हास अनुच्छेद २१ (क) नुसार मोफत शिक्षण, सक्तीचे शिक्षण याविषयीचा मुलभूत अधिकार देते. राज्य यासंदर्भातील तरतूद करेल असेही आश्वासन या अनुच्छेदाने दिले आहे. यापुढे जाऊन मुलभूत हक्क यामधील अनुच्छेद २८ असे स्पष्ट करते की विवक्षित शैक्षणिक संस्थांत धार्मिक शिक्षण अथवा धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य यासंदर्भातील स्पष्टीकरण दिले आहे. (१) पूर्णतः राज्याच्या निधीतून चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत, कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार




नाही. (३) राज्याने मान्यता दिलेल्या किंवा राज्याच्या निधीतून सहाय्य मिळत असणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत उपस्थित राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अशा संस्थेत दिले जाईल अशा कोणत्याही धार्मिक शिक्षणात भाग घेण्यास अथवा अशा संस्थेत किंवा तिच्याशी सलग्न असलेल्या कोणत्याही जागेत, जी काही धार्मिक उपासना चालविली जाईल त्या उपासनेस उपस्थित राहण्यास, अशा कोणत्याही व्यक्तीने, किंवा अशी व्यक्ती अज्ञान असल्यास, तिच्या पालकाने आपली संमती दिली असल्याखेरीज आवश्यक केले जाणार नाही. इतक्या स्पष्टपणे निर्देश दिले आहेत. या अनुषंगाने विचार करीत असताना भारतीय शिक्षण व्यवस्थेसमोरील दीर्घकालीन ध्येयं (भारतीय राज्यघटनेस अभिप्रेत असलेले) म्हणजे वर्ग, जात, लिंग, धर्म, भाषा, वंश, प्रांत या आधारावर कोणताही भेदभाव न करणारा समानतावादावर आधारित समाज निर्माण करणे हे असायला पाहिजे. यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची वीण अधिक घट्टपणे विणली जाईल. खरंतर आपल्या शैक्षणिक धोरणाची दिशा जनवादी, धर्मनिरपेक्ष, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार करणारे व सर्वसमावेशी शिक्षण अशी असायला पाहिजे. भारतीय राज्यघटना आपणास या प्रकारचे शिक्षण देण्याचे आश्वासनही देते, परंतु दुर्दैवाने ती वेगळ्याच दिशेने प्रवास करीत आहे असेच म्हणावे लागेल. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यासर्व घटनात्मक तरतुदी पायदळी तुडवत असल्याचेच पहावयास मिळते. त्यामुळे समाजधुरिणांनी, शिक्षक-पालक-विद्यार्थ्यांनी या धोरणाचा साकल्याने विचार करणे आवश्यक आहे.

शिक्षण कशासाठी आणि कुणासाठी हे समजून घेत असताना मनीष सिसोदिया यांनी आपल्या शिक्षण या पुस्तकात जी भावना प्रकट केली आहे. मला वाटत ते आपण समजून घेतल पाहिजे. ते म्हणतात, "लोकांच्या उत्पन्नवाढीची क्षमता विकसित करणे किंवा देशाच्या आर्थिक विकासात योगदान देणे इतकाच शिक्षणाचा उद्देश नसतो. शिक्षणामुळे राष्ट्र आणि समाजाच्या विवेकाचा स्तरही उंचावतो. शिक्षणविषयक साहित्य आणि संशोधन अहवालात शिक्षणाचे हे उदात्त हेतू नमूद केलेले आहेत; पण वास्तव मात्र वेगळेच आहे. भावी पिढ्यांना शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये, प्रयोगशाळा आणि परीक्षांतून मिळत असलेले शिक्षण फार वेगळे आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध कायदे, करार आणि सहमतीमधून आपण ज्या प्रकारची समाजरचना - उभारण्याचा प्रयत्न करीत आहोत, त्यात शिक्षणाचा एक प्रभावी साधन म्हणून वापर करण्याचा विचारही होताना दिसत नाही." हे सत्य सिसोदिया अधोरेखित करून पुढे म्हणतात की, "कोणत्याही देशातील एकही मूल शाळाबाह्य राहू नये यावर सर्व शैक्षणिक परिषदा आणि चर्चासत्रांत विशेष भर देण्यात येतो. या दिशेने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत, यासाठी विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. उदा. 'एकही मूल शाळाबाह्य नको', 'सर्व शिक्षा अभियान' आणि 'पृथ्वीवरील प्रत्येक मूल शाळेत' हे फार महत्त्वाचे आणि उपयोगी प्रकल्प आहेत. यामध्ये कळीचा प्रश्न हा आहे की, या मुलांना शाळेपर्यंत आणल्यानंतर त्यांना आपण काय देणार आहोत? शिक्षण? की आणखी काही? कोणत्या प्रकारचे? कोणत्या उद्देशाने ?" आपण जोपर्यंत हा उद्देश समजून घेत नाही तोपर्यंत शैक्षणिक धोरणाची दिशा आणि त्यामागील दृष्टी लक्षात येणार नाही. कारण आपल्याला शिक्षणाच्या माध्यमातून केवळ प्रशासक आणि अधिकारी निर्माण करायचे नाहीत, तर उच्च चारित्र्याचे सुजाण नागरिक घडवायचे आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून निर्माण होणारे उच्च चारित्र्याचे सुजाण नागरिक कोणत्या मनोधारणा घेऊन पुढे येणार आहेत हा खरा कळीचा प्रश्न असणार आहे.


यासंदर्भात प्लेटो असं म्हणतो की, "जे चांगला नागरिक निर्माण करतं ते चांगल शिक्षण, स्वतःची उन्नती साधताना समाजाची आणि अंतिमतः राष्ट्राची उन्नती साधणारा माणूस तयार करणारं शिक्षण ते चांगल शिक्षण." ही झाली एक बाजू. दुसरी बाजू अशी की, आपल्याकडे बाजारू शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून स्वतःचा आणि स्वतः विषयीच विचार करणारे नागरिक आपण तयार करीत आहोत. या सर्व बाबीच्या आधारे काही मतं निश्चितपणे नोंदवता येतील. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील निरक्षरांच्या संख्येत सतत वाढच होत आहे. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. समाजातील दुर्बल घटकांचे आणि अनुसूचित जाती- जमातींचे साक्षरतेचे प्रमाण तुलनात्मकरित्या फार कमी आहे. प्राथमिक शाळेतून गळतीचे प्रमाण मोठे आहे. अगदी महाराष्ट्राच्याच विचार करायचा म्हटले तर २०१७-१८ मध्ये उच्च शिक्षणामधील विद्यार्थी गळतीचे प्रमाण एक चतुर्तांश इतके अधिक होते. (सुखदेव थोरात) म्हणजेच उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी एक चतुर्तांश विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या अगोदरच शिक्षण प्रक्रियेतून बाहेर फेकल्या गेले आहेत. ग्रामीण भागात विद्यार्थी गळतीचे प्रमाण जास्त म्हणजे ३० टक्के इतके आहे. तुलनात्मकरीत्या शहरी भागात १८.६ टक्के इतके कमी आहे. सर्वसाधारण गळतीच्या तुलनेत मुलींच्या गळतीचे प्रमाण अधिक असून नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर ही आकडेवारी अधिक चिंतनीय ठरणार आहे. या गळतीचा विचार केला तर अनुसूचित जमातीमध्ये ४० टक्के, अनुसूचित जातीत ३२ टक्के, इतर मागास प्रवर्गात २५ टक्के इतके असून उच्च जात गटामध्ये हे प्रमाण १७.५ टक्के आहे. याबरोबरच कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण ३८ टक्के इतके अधिक तर उच्च उत्पन्न असलेल्या कुटुंबातील गळतीचे प्रमाण ९ टक्के इतके कमी असल्याचे पहावयास मिळते. **क्रमशः**

# 'आत्मपीठ' काव्यसंग्रह प्रकाशनाचा अक्षर-सोहळा !

आधुनिक केसरी

**रसिक हो, असं म्हणतात की, कवी हा जन्माला यावा लागतो, आणि काहींच्या बाबतीत ते खरंही आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीची कवी मनाची ही तरलता, हळवेपण, अन्यायाबद्दलची चीड, त्याच्या वागण्या-बोलण्यातून, समाजाप्रतीच्या सजग जगण्यातून आणि संवेदनशील लिहिण्यातून व्यक्त होत असते तेव्हा नकळत आपणही दाद देत असतो. अशीच एक दाद घेणारी, स्त्री विषयीच्या जाणिवा आपल्या धारदार तेवढ्याच आशयघन, व सशक्त कवितांनी प्रगल्भ करणारी प्रतिथयश कवयित्री, साहित्यिका ॲड. मंदाकिनी पाटील, ग्रंथप्रेम जोपासणाऱ्या आपल्या गावाचं, बदलापूरचं नाव, सतत क्षितिजापार नेत आलीये. आपल्या कवितांनी मराठी साहित्याचं दालन समृद्ध करणाऱ्या या कवयित्रीचं मन, आपल्या कवितेविषयीच नाही तर; आपल्या गावाविषयी सुद्धा संवेदनशील आहे हे या एका छोट्याशा उदाहरणावरुन लक्षात येतं.**

एक दिवशी सहज बोलता बोलता मला त्या म्हटलेल्या - "माझ्या हातातील या छोट्याश्या पर्सपासून ते लग्नाच्या कपड्यालत्त्यापर्यंतची सगळी खरेदी मी, आमच्या बदलापूरातूनच करते, दोन पैसे जास्त जातात, पण आमच्या गावच्या माणसाच्या हातात दोन पैसे दिल्याचं समाधान मिळतं. त्यांची रोजी-रोटी माझ्यासाठी महत्वाचीये," आपण जिथं राहातो त्या गावाविषयी एव्हढं प्रेम बाळगणाऱ्या, या कवयित्रीचं हेच संवेदनशील मन मात्र; जेव्हा स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध बोलतं होतं, तेव्हा त्या शब्दांना खड्‌गाची धार असते. 'दूध-भाताबरोबर आपल्या आई-बाबांनी कविताही भरवली' असं अभिमानाने सांगणाऱ्या या कवयित्रीच्या, ॲड. मंदाकिनी पाटील यांच्या दुसऱ्या 'आत्मपीठ' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा त्यांचे यजमान ॲड. मा. विजय पाटील यांच्या हस्ते नुकताच बदलापूर येथे संपन्न झाला. मा. सुमती लांडे यांनी 'शब्दालय' या त्यांच्या प्रकाशनाद्वारे प्रकाशित केलेल्या या संग्रह प्रकाशनाचा हा छोटेखानी अपूर्व सोहळा, कवितेचा जिव्हाळा जपणा-या अगदी मोजक्याच जीवलगांच्या उपस्थितीत ॲड. मंदाकिनी यांच्या राहत्या घरी; 'मूलाधार' येथे पार पडला. या प्रसंगी प्रमुख वक्त्या सुप्रसिद्ध कवयित्री संगीता अरबुने यांनी, ॲड. मंदाकिनी यांच्या काव्यसंग्रहाचा सखोल आढावा घेत, अतिशय अभ्यासपूर्ण विवेचन केलं व, 'आत्मपीठ' या काव्यसंग्रहातील कविता साहित्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या आहेत असे प्रतिपादन केले. तदनंतर, सुप्रसिद्ध कवयित्री अलका गांधी असेरकर यांनी - 'आत्मपीठ' मधील कविता-काव्य हे मंदाकिनी पाटील यांच्या जगण्यातून सिद्ध होत आलंय' असं सांगत, ॲड. मंदाकिनी यांचा काव्यप्रवास अतिशय समर्पक अशा शब्दांत उलगडला. सुप्रसिद्ध कवी व चित्रकार, रामदास खरे यांच्या संकल्पनेतून उतरलेल्या या संग्रहाच्या मुखपृष्ठाच्या निर्मितीचं हृद्य असं शब्दरेखन, त्यांनी स्वतःच केलं, आणि ॲड. मंदाकिनी यांची कविता काळाच्या दोन पाऊल पुढे असल्याचं नमूद केलं. सुप्रसिद्ध कवयित्री संध्या लगड यांनी संग्रहातील 'अंबरझुंबर' ही कविता सादर केली. ॲड. मंदाकिनी यांची बहीण, मुख्याध्यापक वृषाली पाटील यांनी, मंदाकिनी यांचा जीवनप्रवास आपल्या सहज शैलीत, अकृत्रिमतेने तेवढाच हळूवारपणे उलगडला तेव्हा सा-यांचेच डोळे पाणावले. श्रद्धा साळी यांचं सूत्र संचालन लाभलेला, व मान्यवर



उपस्थितांच्या स्नेहभोजनानंतर; अगदी साधा-सुधाच पण वेगळ्या उंचीवर जाऊन पोहचलेला हा अक्षर-सोहळा उपस्थितांची दाद तर मिळवून गेलाच, आणि मराठी साहित्य विश्वाच्या मोतिया गळ्यात एक अनमोल असा शब्द-दागिनाही झळकावून गेला.

मनोहर मंडवाले
संपर्क क्र. 8879123236

# वस बुडविणार आहोत का आपण माणुसकी निर्माण करणाऱ्या शिक्षणाचा ?

## संयमाचा परीघ



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226



चित्र : बाबूराव पाटील, भोकर

भाग : ८

***आपला विरोध कशाला आहे नेमका ? आपण कुणा विरोधात लढा उभारु पहात आहोत नेमके ? आपला शत्रू कोण आहे नेमका आणि आपला मित्र कोण आहे नेमका ? आपण का लढतो आहोत आपापसातच ? कोणाविरुद्ध आहे आपण बंड पुकारलेले ? तो जो आज याच्या विरुद्ध लढ म्हणून उचाटनी देतो कालांतराने तो त्याच्या भकीला बसलेला असतो.***

क्षणार्धात बदलत जात आहेत समिकरणं ! आपण ठाम पणे कुणाच्या बाजूनं जायचं ? भुजा आहेत,आपल्याला आहे का मुळात बाजू ? का वागंत असतील माणसं असे ? कोण बदलतो माणसांच्या मनाचा कौल ? हैरान करुन सोडणारे प्रश्न आहेत ना ? मुळात हे आहे काय आणि असं का असतं ? इतिहास सांगतो ओरडून याने त्याचे पाय चाटलेआणि त्याने त्याचे पाय छाटले. याला सपोर्ट करणारे कोण होते आणि मग त्याची बाजू न्यायाची म्हणणारे कोण होते ? नितीलाही आहेत सपोर्टर्स आणि अनितीचेही आहेत पाठीराखे.आपल्यातल्या कुणाला विचारलं म्हणजे होईल कन्फर्म की कुठली बाजू आहे रास्त ? हे चांगलं तर मग ते का नाही ? ते चांगलं तर मग हे का नाही ? या आणि अशा प्रश्नांनी चर्चा बहरायला हव्यात.तान तनाव निवळायला हवेत.माहित नसल्यामुळं अर्थात अज्ञानामुळं एवढं सगळं वाट्टोळं झाल्याचं आठराव्या शतकातंच महात्मा फुलेंनी सांगून ठेवलं आहे. आपल्या आकलनाच्या आणि अर्थातच आचरणाच्या पातळीवर आपण ते कधी आणलं नाही.नळी फुंकिली सोनारे आणि इकडुन तिकडे गेले वारे' अशी गत झाली आहे.

महाभारत अनेकदा ऐकलं आपण कधी टी व्ही वर कधी व्याख्याणातुन.ज्ञानेश्वरांनी ते सामान्य माणसांनाही कळावं यासाठी आयुष्य पनाला लावून ते प्राकृतमधेही आणलं मोजकं तितकंच.अगदीच हातपाय गाळून बसलेल्या अर्जुनाला पुन्हा धनुष्य रोखायला लावणारा तो महाभारतातला मजकुर आहे ज्याला आपण ज्ञानेश्वरी म्हटलं आहे.समोर आजोबा आहेत, चुलतभावंडं आहेत, आप्त स्वकीय आहेत.त्यांच्यावर बानवृष्टी कशी करु हा त्याला पडलेला प्रश्न आहे. ते मेले तर माझेच आहेत आणि हे मेले तरी माझेच आहेत.मग माझे कोण आणि ते कसे माझ्याच विरोधात दंड ठोकून उभे आहेत ? हा संभ्रम कृष्ण ज्या पद्धतीने दूर करतो,ती पद्धध समजून घेतली पाहिजे.ते मनातलं द्वंद्वं समजून घेतलं पाहिजे.बाबासाहेब म्हणाले मी राम आणि कृष्णाला देव माणणार नाही.बाबासाहेबांनी त्यांचं माणुस असणं कुठं नाकारलं आहे ?बरं हे सगळं सांगण्यापुर्वी त्यांनी किती आणि काय काय वाचन केलं आहे ? याचा साधा विचारही करायचा नाही का आपण ? चक्क वाङमयाचं वाचनच सोडून दिलेले चळवळीतल्या मंडळींना हे वाचायलाही जड जाणार आहे याची नम्र जाणिव आहेच मला.

मुद्दा हा आहे की आपले तुपले कुणाला म्हणायचं आणि का ? आधार जातीचा द्यायचा की धर्माचा ? या चळवळीचा द्यायचा की त्या ? अशा सगळ्या प्रश्नांचा समाचार घ्यायला आपण कधी तरी प्लेटो आणि अरिस्टॉटलच्या चर्चा वाचाव्या लागतील. कधीतरी मिलींदचे प्रश्न वाचावे लागतील.कधी तरी तुकोबाच्या चरीत्राला हात घालावा लागेल. कधी तरी राजकुमार गौतमाला पडलेल्या प्रश्नांचा उलघडा वाचावा लागेल.कधीतरी षडरिपू काय आहेत आणि काय काम करतात हे पहावं लागेल. कधीतरी व्याख्यानं ऐकावे लागतील.कधी तरी ग्रंथालयात पायधूळ झाडावी लागेल.कधी तरी रचून ठेवलेल्या पुस्तकांची दया यावी लागेल आपल्याला ? अज्ञानामुळं जर इतकं सगळं वाटोळं होत असेल तर मग आहे ते ज्ञान धूळ खात पडलंय ती धूळ झटकावी लागेल.मेंदूवर साचलेला मळाचा वट खरडून काढावा लागेल.गांभीर्यीनं घ्यावं लागेल आपल्याला पुस्तकांनी घटका मोजणारं ज्ञान.कळत्या माणसांचा नाद करावा लागेल.सद्‌गुणी लोक तुमचे सन्मित्र असायला कांही हरकत नसावी.ज्यांच्या आचार विचारातून आपले संभ्रम निघून जातील आणि पुन्हा आपलं जगणं प्रवाही होवू शकेल, असा गातावळा आपला असायला हरकत नसावी. काळ कुठलाही असो, शकुनी आहेतच.कैकयी आहेच. कुटाने आहेतच. आपल्या भवतालातल्या कैदाशा कळायला हव्यात आपल्याला.आपल्या भवतालातलं भयंकर अघोरीपण कळलं नाही आपल्याला तर होणारंच आपलं शोषण आणि बळीच पडणार आपण.चांगल्या वाईटातला भेद कसा सांगणार आहोत आपण ? आप-परभावाची जाणिव कशी सांगणार ? कोणत्या कसोट्यांवर पारखायचं आपण भलं-बुरं, चांगलं-वाईट, यौग्य-अयौग्य, खरं-खोटं ? लोभी लोक, लालची लोक, ल्हाचर लोक, मध मोह माया मत्सरांनी ग्रासलेली मंडळी ओळखायची कशी ? आपल्याच रक्ता मासाचे म्हणून, जाती धर्माचे म्हणून, आपल्यातल्याच गटा-तटाचे म्हणून ? ओळखायचं कसं आपल्या जगण्याचा वास उठला आहे हे ओळखायचं कसं ? ही पुस्तकं वाचू नयेत, त्याला हात लावू नका, अशा बावळट बंधनांनी तर नासवली नाही ना आपण आडी ? हे महात्मा गांधींच्या तीन माकडांचे काय घेतले आहेत अर्थ आपण ? साने गुरुजींचं आणि आपलं काहीच नाही का घेणं देणं ? का बरं आत्महत्या केली होती साने गुरुजींनी ? महायुदध जगावर लादून, लाखो ज्यु लोकांची कत्तल करुन जग जिंकायला निघाला होता ना हिटलर,मग का बरं गोळ्या झाडल्या स्वतःवरंच ? हाव जिंकायला हवा होता ना ? द्वेश जिंकायला हवा होता ना ? क्रोध जिंकायला हवा होता ना ? मोह जिंकायला हवा होता ना ? मत्सर जिकायला हवा होता ना ? नाही ना ? यातल्या कुणालाच सुख शांती समाधान मिळालं नाही. अखेर मेलेच ना ? का राहिला कुणी देहानं अजरामर ? देह जाणारंच.जातोच.आणि तरी माणुस एवढा लालची, एवढा कुटानेखोर, एवढं छक्केपंजे करु कसा ? का हा एवढं सत्तेचा हाव ? संपत्तीचा हाव ? जगु द्या ना रे बाबा माणसांना आनंदानं ? का ओढायलात सगळं आपल्याच पोटावर ? किती तरी भुका आहेत तुम्हाला ? कशाला हवीत इतकी घरं ? कशाला हवेत इतके प्लॉट्स ? कशाला हव्यात इतक्या गाड्या ? कशाला हवेत इतके रानं ? इतके दुकानं ? इतक्या संस्था ? इतके पदं ? इतकी प्रसिद्धी ? इतका पैसा ? इतके कपडे ? इतके चपला बुटं ? भवतालाकडं बघा राव ? थंडीनं काकडून मरायलेत माणसं, ना अंथरायला आहे कांही त्यांच्याकडं ना पांघरायला ?कुणं पळवली त्यांची भाकर ? कुणं मारले त्यांचे हक्क ? कुणी लुबाडलं त्यांच्या हिश्याचं सुख ? कधी पडंत नाही प्रश्न की का बरं ही पालात रहात असतील माणसं ? रस्त्याच्या कडंला का बरं मांडली असेल तीन दगडाची चूल ?

तुम्हाला कोरडी स्वप्नं पडून उपयोग नाही. तुम्ही ज्या दिवशी आपल्या जन्माचं प्रयोजन समजून घ्याल, तो दिवस धन्य.कुणाचं खपाटीला गेलेलं उपाशी पोट पहाल आणि भूक मरुन जाईल तुमची, तो दिवस धन्य.ज्या दिवशी कुण्या निराधार आजीची, आजोबाची काटी व्हाल तो दिवस धन्य. तुमचा कोणी तरी जबर आपमानच करायला पाहिजे का तुम्हाला अक्कल यायला ? ज्या दिवशी तुम्ही जात, धर्म, लिंग, भाषा,वय,प्रांत आदी सीमा पार करुन आपुलकी जिव्हाळ्याची वागणुक द्याल तो दिवस धन्य.ज्या दिवशी तुम्ही राग लोभ द्वेश मोह माया मत्सर आदी षडरिपुंवर विजय मिळवाल तो दिवस धन्य ! तुम्हाला विकार मुक्त करणं हेच तर काम आहे शिक्षणाचं पण त्याचीच काय हेळसांड लावली आहे सरकारांनी.ना नीट शाळा चालू दिल्या जात आहेत ना महाविद्यालये.जिथून तुम्हाला शहानं करुन जीवन जगण्यासाठी समाजात पाठवायचं आहे त्याच शिक्षण व्यवस्थेच्या पायात सुरुंगं लावली चालली आहेत. सगळंच संपल्यावर करायची आहे का सुरुवात कांही चांगलं करायची ? त्या आधी पावलं उचलली तर कांही बिघडेल का आपलं ? कधी तरी गांभिर्यानं घेणार आहोत की नाही आपण शिक्षणाला ? षडरिपूंवर मात करायला शिकवणार आहोत की नाही लेकरांना ? जगातले तमाम धर्म नाहीत का ओरडून सांगत...तृष्णा हेच आपल्या दुःखाचं कारण आहे. मग...नकोच आहे का आपल्या देशाला सद्‌गुणी नागरीक निर्माण करणारं शिक्षण ? कुठवर कवटाळंत बसणार आहोत आपण आपापली बारकुली द्वेष, इर्षा, मत्सर पेरणारी वर्तुळं ? व्यापक जनहिताचा विचार कधी करणार आहोत आपण ?कष्टाळू माणसं नको आहेत का समाजाला ? कनवाळू काळीज निर्माणाच्या कार्याला बळ नको द्यायला ? कठोर काळजाच्या निष्ठुर माणसांनी माणुसकी मारुन टाकली आहे.आपल्या घरा-दारात, गावात-देशात दया, माया, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी उबद-याच येवू द्यायची नाही यांना ? तुमच्या काळजाला पाझर कसा फुटणार जर तुम्ही कधी कुणाचं दुःखंच जवळ बसून, ऐकून घेतलं नाही तर ? वस बुडविनार आहोत का आपण माणुसकी निर्माण करणा-या शिक्षणाचा ?

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत)**

# जयंतराव, निर्लज्जपणाचा अर्थ बेशरम ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**राष्ट्रवादी पक्षाचे जेष्ठ प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटलांनी नागपूरच्या अधिवेशनात विधानसभा अध्यक्षांना उद्देशुन निर्लज्ज शब्दाचा वापर करून खळबळ उडवून दिली. सहज शब्द त्यांच्या तोंडून जाणं शक्य नाही. कारण ते नव्याने सभागृहात आलेले नाहीत. जाणिवपूर्वक निर्लज्ज हा शब्द त्यांनी वापरलाच म्हणावा लागेल. मराठी शब्दकोशात निर्लज्ज शब्दाचा अर्थ बेशरम असा होतो. दुसरा अर्थ संविधान व्यवस्था चालवण्याचा ज्यांना अधिकार दिला त्यांच्यात पात्रता नाही. असाही अर्थ काढल्या जातो.**

असंविधानिक शब्दाचा लोकशाहीच्या सभागृहात जबाबदार नेत्याकडून वापर होत असेल तर मग एखादा शब्द मंत्री चंद्रकांत दादाच्या तोंडून गेला ज्या शब्दाला प्रबोधनकार ठाकरेंनी त्यांच्या पुस्तकात भीक लिखित मान्यता करून ठेवली. मग पोटशूळ उठण्याचं कारण काय? राष्ट्रवादीला आपला तो बबल्या अन् दुसऱ्याचं कार्ट राजकारणात नेहमीच वाटतं. वर्षानुवर्षे सत्ता भोगलेली माणसं ओलंही जळतं आणि वाळलंही जळतं या तोऱ्यात असतात. अजितदादा पवारांनी गदारोळ करण्यापेक्षा संयमाची भुमिका घेवुन माफी मागणं यालाच सकारात्मक राजकारण करणारा नेता असंही म्हणता येईल. त्यांचं कौतुक नसे कमी. नागपूर स्थित सरलेला अधिवेशनाचा आठवडा सत्ताधाऱ्यांना काम करू न देण्यासाठी विरोधक यशस्वी राहिले असं म्हणता येईल. राज्यात सत्ता परिवर्तनाचं दुःख विरोधकांच्या पावलोपावली आढळून येतं. त्यामुळे पराचा कावळा करत आरडाओरडा आणि गोंधळ घालणं एवढंच काम सद्या विरोधक अर्थात महाविकास आघाडीच्या नेत्याकडून सुरू असताना दिसतं. मंत्री चंद्रकांत दादा पाटलांच्या एका शब्दाचा पराचा कावळा करत याच राष्ट्रवादीच्या मंडळींनी आदळआपट करत त्यांना बदनाम करण्याचं कुटिल कारस्थान राज्यभर हाती घेतलं. भीक मागणं हा शब्द प्रबोधनकार ठाकरेंनी त्यांच्या पुस्तकात लिहिला त्याची एक सत्यप्रत नागपूरात मंत्री पाटलांनी मा.उद्धव ठाकरे यांच्याकडे सुपुर्त केली. त्यानंतर पुस्तकातुन उद्धव ठाकरेंनी काय बोध घेतला? त्यांनीच माहितीय. पण जेव्हा काहीच करायचं नाही आणि आपण केलेला भ्रष्टाचार बाहेर पडु नये म्हणुन नको त्या गोष्टी उकरून काढायच्या, नाही त्याचं भांडवल बनवयाचं हा स्थायी स्वभाव महाविकास आघाडीच्या साऱ्यांच पक्षाचा त्यात मग काँग्रेसवालेही मागे रहाणार कसे? सत्ताधाऱ्यांवर आरोप करताना बेताल शब्द एखाद्या जेष्ठ अनुभवी माणसाच्या तोंडून जातात कसे? याचं उदाहरण जयंतराव पाटलांच्या निर्लज्ज शब्दातून बाहेर आलं. मुळात या शब्दाचा सभागृहात वापर करणे खरं तर फारच अज्ञान म्हणावे लागेल. निर्लज्ज म्हणजे दुसरा अर्थ बेशरम हा सुद्धा होतो. सभागृहाचे अध्यक्ष विद्याभुषित विधितज्ञ आणि अभ्यासु राजकिय जेष्ठसुद्धा आहेत. जयंतरावांनी व्यक्तीद्वेषातून निर्लज्ज शब्दाचा जाणिवपुर्वक वापर केला यात तिळमात्र शंका नाही. सभागृहाने त्यांना अधिवेशन काळापुरतं निलंबित केलं. कारण संविधानदृष्ट्या काळाची गरजच म्हणावी लागेल. असंविधानिक शब्दाचा वापर एखाद्या ओट्यावर बसल्यानंतर आपण करतो. ज्यांना सभागृह आणि त्याचे पावित्र्य लक्षात रहात नाही ते कुठले राजकारणी असे अनेक सवाल पुढे येतात. आश्चर्य म्हणजे निलंबन केल्यानंतर राज्यभर निदर्शने राष्ट्रवादी पक्षाकडून केले जाणं तोही उताविळपणाच म्हणावा लागेल. मोठ्या साहेबांनी त्या शब्दाचं समर्थन केलं नाही किंवा प्रतिक्रिया दिली नाही. त्याहून अधिक विरोधी पक्ष नेते अजितदादा पवारांनी घेतलेल्या भुमिकेचं कौतुक करावं तेवढं कमीच. निलंबनावर अजितदादाच्या भुमिकेवर अनेक शंका कुशंका घेतल्या जात असल्या तरी त्यांचा दुरदृष्टीपणा, परखडपणा आणि संयमाची भुमिका नागपूरात राज्याला पहायला मिळाली. निर्लज्जपणाचा अर्थ काय होवु शकतो? अजितरावांना चांगलंच माहिती असावं. जयंतराव पाटलांच्या वतीने त्यांनी सभागृहात माफी मागितली. विरोधी पक्ष नेत्याच्या अंगात असलेली ही नम्रता वर्तमान लोकशाहीला आदर्श देण्यासारखी म्हणावी लागेल. निर्लज्ज दुसरा अर्थ बेशरम मग जयंतरावांना अध्यक्षांना बेशरम म्हणायचे का? आणि मग हे शब्द तोंडी शोभते का? त्याहून अधिक जयंतरावची दुसरी चुक म्हणजे संविधानाच्या चौकटीत बसुन लोकशाहीचं सभागृह व्यवस्था चालवण्यासाठी अध्यक्ष पदाची निर्मिती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेच्या कायदे प्रपंचातून झाली. मग ते अध्यक्ष निर्लज्ज तर मग जयंतरावांनी संविधानाचा अपमान केला नाही का? असाही प्रश्न पुढे येतो. तुम्ही काहीही बोलायचं? कसंही वागायचं? आपलं ओलंही जळतं आणि वाळलंही जळतं या तोऱ्यात जणु काही जयंतराव पाटलांनी सभागृह अध्यक्षांवर निर्लज्ज म्हणत राग काढला. कधी कधी जेष्ठ माणसं देखील सत्ता हाती नसल्यानंतर ताळमेळ ठेवुन वागत नाहीत याचं हे उदाहरण आहे. वर्षानुवर्षे ही मंडळी सत्तेत असुन महाराष्ट्राचं राजकारण जणु काही आपली मक्तेदारी हा अहंभाव त्यांच्या मानसिकतेत घुसलेला असतो. एव्हाना राज्याचे सत्ताधारी म्हणजे आम्हीच असंही त्यांना वाटतं. कदाचित याच मानसिकतेमधून निर्लज्ज शब्द त्यांच्या तोंडून सहज नव्हे तर जाणिवपुर्वक बाहेर पडला.



सत्ताधाऱ्यांनी त्यांचं निलंबन करून फार मोठं धाडस दाखवलं. कारण कायद्यापुढे कुणाचं चालत नाही. शिंदे-फडणवीसांचं कौतुक करावं तेवढं कमीच. अधिवेशन काळापुरतं त्यांचं निलंबन केल्यानंतर राष्ट्रवादी पक्षाकडून राज्यभरात निदर्शने सुरू असली तरी जयंतरावांनी चुकीचं वर्तन झाल्याबद्दल आत्मक्लेश करायला हवा होता. मागे एकदा विरोधी पक्ष नेते अजितदादा पवारांनी एक दिवसाचं आत्मक्लेश उपोषण केलं होतं. संयम आणि शांत स्वतःला गांधीवादी समजणाऱ्या जयंतराव पाटलांनी आत्मक्लेश मार्ग पत्करला असता. कदाचित लोकांनी त्यांना माफ देखील केलं असतं. पण आपलं चुकलंच काही नाही. निर्लज्ज, बेशरम याहुन अधिक आपण काहीही बोलु शकतो या तोऱ्यात विरोधक सद्या गाजावाजा करताना दिसु लागले. अजितदादा पवारांनी कठोर भुमिका घेतली नाही म्हणून त्यांच्याच पक्षात तर्क वितर्क काढण्याचं काम सद्या सुरू झालेलं दिसतं. इकडे ठाकरे शिवसेना नेत्यांचे देखील डोळे टवकारले म्हणावे लागतील. कदाचित अजितदादा शांत बसले म्हणून हीच मंडळी उघड रस्त्यावर येवुन त्यांच्यावर आरोप करायला मागे रहाणार नाहीत. पण बिचाऱ्या अजितदादांनी विधानसभेत निलंबन प्रश्नावर मांडलेली संयमी भुमिका हे सुसंस्कृत राजकिय नेत्याचं वर्तन म्हणावे लागेल. ज्याच्यातून बोध जयंतराव पाटलांनी देखील घ्यायला हवा. शब्दांच्या भांडवली आणि कोटी करत विनाकारण जर आपण सत्ताधाऱ्यांच्या विरोधात रान उठवत असोत तर मग आपल्या हातून झालेल्या चुका ते कोणत्या लोकशाहीचं प्रतिक म्हणावे लागेल. बाकी काही असलं तरी भविष्यात याच चुकीचा काय बोध जयंतराव घेतील? ते लक्षात येईल. अजितदादांना अंतर्गत तर्क वितर्कांनी टार्गेट करण्यापेक्षा आपल्या तोंडून जाणिवपुर्वक झालेल्या चुकीची स्वतःला काय शिक्षा घ्यायची? हे आता राष्ट्रवादी प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटलांनी अगोदर ठरवायला हवं. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात गोंधळ घातल्यानंतर निलंबन हे काही नवं नाही. ठाकरे सरकार अर्थात महाविकास आघाडी सत्तेवर असताना देखील भाजपाच्या बारा आमदाराचं निलंबन याची आठवण या निमित्ताने राजकिय वर्तुळात झाल्याशिवाय रहात नाही. एक गोष्ट खरी आहे वर्तमानकाळात राजकिय संस्कृती बिघडत चालली असुन कोण कोणत्या स्तराला जाईल सांगणे अवघडच आहे. निर्लज्ज, बेशरम या शब्दाचा वापर संविधानाच्या सभागृहात होत असेल तर याशिवाय लाजिरवाणी गोष्ट कोणती नाही.

# कावळा आणि कोल्हा

आधुनिक केसरी

एकदा काय झालं एक कावळा रानावनामध्ये फिरत असताना त्याला एक चपाती चा तुकडा मिळाला चपाती चा तुकडा घेऊन येतो काळा जंगलातील एका झाडावर बसला. चपाती खाण्याचा विचार करत असताना काळाच्या मनात कल्पना आली की आता एक चपाती मिळाले उद्या पर्यंत अन्न शोधण्याची गरज भासणार नाही तेवढ्यात झाडाखालून एक कोल्हा जात होता व त्या कुणाची नजर झाडावर बसलेल्या कावळ्याच्या चोचीतील चपाती कडे गेली.

आपल्याला देखील कावळ्याच्या चोचीतील चपाती खाण्याची तीव्र इच्छा झाली त्यासाठी एक युक्ती सुचवली.

कोल्हा कावळ्याला म्हणाला, " काय कावळे भाऊ कसे आहात फार दिवसांनी दर्शन झाले तुमचे. फार दिवस झाले तुमचा आवाज ऐकला नाही आणि तुमच्या आवाजातील गाणे देखील ऐकले नाही किती मधुर आहे तुमचा आवाज एकदा मला तुम्ही गाणे म्हणून दाखवा."

कोल्हे यांनी केलेली स्तुती ऐकून कावळा अगदी आनंदित झाला व गाणे म्हणण्यासाठी कावळ्याने आपली चोच उघडतात चोचीतील चपाती खाली पडली कोह्याने ती चपाती पटकन उचलली आणि पळाला.

जात असताना कुल्र्याला वाटेमध्ये एक नदी लागली कोल्हा पळून खूप दमला होता व त्याने पाणी पिण्यासाठी नदीमध्ये वाकून पाहिले असता त्याला स्वतःचे प्रतिबिंब दिसले. कोल्हा होता मूर्ख त्यांना वाटले की नदीमध्ये आणखीन एक कोणतातरी कोल्हा आहे व त्याच्या तोंडामध्ये एक चपाती आहे मग ही देखील चपाती आपल्याला मिळाल्याने दोन चपात्या मिळतील व आपले पोट भरेल असे विचार करून कोल्हाने ओरडण्यासाठी तोंड उघडताच त्याच्या तोंडातील चपाती नदीमध्ये पडली. अशाप्रकारे कोल्ह्याला चपाती खायला मिळाली नाही व त्याला त्याची चूक करावी.

**तात्पर्य:** मित्रांनो या कथेतून आपल्याला दोन गोष्टी शिकायला मिळता. एक म्हणजे कधीही खोटी प्रशंसा वर आनंदित होऊ नये. दुसरी म्हणजे लालच खूप वाईट सवय आहे.

# नाशिक-वणी रस्त्यावर गाडीने घेतला पेट; जीवीतहानी टळली

आधुनिक केसरी न्यूज

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यातील नाशिक-वणी महामार्गावर आज दि.२६ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी २.००ते ३.०० च्या दरम्यान वणीकडे जाणाऱ्या चार चाकी गाडीने अचानक पेट घेतल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवांने जीवीत हानी टळल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. मिळालेल्या माहितीनुसार योगेश प्रकाश गिरासे वय-३२ राहाणार होडनाथे ता.शिरपूर जि.धुळे यांच्या ताब्यातील महेंद्रा लोगन गाडी नंबर एमएच-१५,सीटी ६३३३या गाडीने नाशिकहुन वणी गडावरील देवीच्या दर्शनासाठी जात असताना दिंडोरी जवळली वनारवाडी फाट्याजवळ गाडी घेऊन आलो असताना गाडीत जळण्याचा वास येऊ लागल्याने गाडी चालक योगेश गिरासे यांनी गाडी रस्त्याच्या बाजूला घेत गाडीचा बोनट उघडताच त्यातून धुर निघताना दिसला. नंतर धुराचे रूपांतर हळूहळू आगीमध्ये होऊ लागल्याने नंतर मात्र आगीने अचानक प्रचंड पेट घेतल्याने आजू बाजुला नागरिक उपस्थित होते. त्या सर्व जमलेल्या नागरिकांनी व दिंडोरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ, उपनिरीक्षक अरुण आव्हाड, पोलीस हवालदार मुंढे इ. यांनी पाणी टाकून आग विजविण्याचा आटोकाट प्रयत्न केला परंतु नागरिकांना आग विजविण्यात यश आले नाही. व बघता बघता गाडी पुर्णपणे जळून खाक झाली. लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. मात्र या अपघातांत जीवीत हानी टळल्याने उपस्थित नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. पुढील तपास दिंडोरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अरूण आव्हाड, पोलीस हवालदार मुंढे हे करीत आहे.






# डी. फार्मसी करत २२ लाखांच्या मोटरसायकल चोरल्या, एक २२० सी.सी.ची विकत घेतली

## गुन्हेशाखेने साथीदारासहित बेड्या ठोकल्या, २२ लाखांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहरातील ६ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हॅन्डल लॉक नसलेली मोटरसायकल शोधून गेल्या वर्षभरात २२ लाख रु. किमतीच्या मोटरसायकल चोरणाऱ्या कॉलेजकुमाराला रांजणगाव शेणपुंजी परिसरातून गुन्हेशाखेने पाठलाग करत पकडले, वरील प्रकरणी वेदांतनगर, जवाहरनगर, सिडको, वाळूज औद्योगिक, सिडको औद्योगिक, क्रांतिचौक या पोलीस ठाण्यामध्ये दाखल असलेले ३७ गुन्हे क्राईमब्रँचने उघडकीस आणले. वरील प्रकरणात शैलेश गोरख खेडकर (२०) रा. आंबागाव, ता. कन्नड, हल्ली





मु.रांजणगाव शेणपुंजी तर विजय सूर्यभान आळिंग रा. कन्नड धंदा जुने वाहन खरेदी विक्री यांना अटक करण्यात आली आहे. शैलेश खेडकरने चोरून आणलेल्या गाड्या विजय आळिंग विकून देत असे, चोरीच्या पैशातून खेडकर स्वताच्या शिक्षणाचा खर्चही भागवत असल्याचे त्याने पोलिसांना दिलेल्या जबाबात सांगितले. वाळुज औद्योगिक परिसरात त्याचे आईवडिल नौकरी करतात. गुन्हेशाखा गेल्या तीन महिन्यापासून शैलेश खेडकरच्या मागावर होती, सी.सी, टीव्हीही फुटेज व अन्य माहितीच्या आधारे खेडकरला ताब्यात घेतल्यावर त्याच्या ताब्यातून १५ लाखांच्या मोटरसायकल जप्त केल्या तर विजय आळिंगच्या ताब्यातून ७ लाखांच्या मोटर सायकल जप्त केल्या आहेत. वरील कारवाई पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता , पोलीस उपायुक्त अपर्णा गीते, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल ढुमे, पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अजित दगडखैर, एएसआय रमाकांत पटारे, संजय नंद, सुनील बेलकर, संदीप राशिनकर, नितीन देशमुख तात्याराव शिनगारे यांनी पार पाडली.

# चला जाणूया नदीला कार्यक्रमात गाण्यावर थिरकले चिमुकले

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** स्वातंत्र्याचा आमृत महोत्सव अंतर्गत कन्नड तालुक्यातील चला जाणूया नदीला स्वच्छ सुंदर नदी बनवुया शिवना नदी संवाद यात्रेला कळंकी येथील शिवना नदीचा उगम झाला तेथुन ही संवाद यात्रा सुरू झाली असुन आंधानेर येथुन मक्रणपूर गावात ही संवाद यात्रा आल्या नंतर जिल्हा सन्वयक गोकुळ सुरासे यांनी मक्रणपुर जिल्हा परीषद शाळेतील विदयार्थींना नदी स्वच्छ कशी ठेवायची कचरा कश्या पद्धतीने हाताळावा याचे दुष परीनाम सांगण्यात आले. यावेळी जिल्हा परीषद शाळेतील विदयार्थींनी स्वच्छतेच्या गाण्यावर ताल धरल्याने मुलांचे मोठे कौतुक होत आहे.

या वेळी गोरख पाटील बोलतानी म्हणाले मक्रणपुर शिवना नदीमध्ये कन्नड शहरातील भुमीगत गटारीचे पाणी सोडले असून मक्रणपूर पुला लगत असेलेल्या माश्याचा व्यवसाय करण्याऱ्या व्यवसाईक व खाटीक व्यावसाईक मासे व कोंबडीचे पखे व मास आणुन या शिवना नदीत टाकत असल्याने भयंकर दुर्गंधी पसरत आहे या मुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका आहे म्हणुनच शहराचे मुख्य अधिकारी नगर परीषद कन्नड यांनी जातीने लक्ष घालुन या वर तोंडगा काढावा अत्यंत भयंकर बाब आहे. दुसरे असे की मक्रणपुर पुलाखाली



नदीचे खोलीकरण करून एक बंधारा बांधुन धोबीघाट करावा यामुळे गावातील महीलांना धुणे धुण्यास जागा व स्वच्छ पाणी मिळेल तसेच बंधाऱ्यामुळे नदीपात्रात पाणी तुंबल्यामुळे शेतकरी यांच्या विहीरीची पाणी पातळी ही वाढेल .


यावेळी मंडळ अधिकारी सतीश भदाणे , जिल्हा सन्वयक गोकुळ सुराशे, विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे, मुख्याध्यापक मधुकर पवार, वन विभागाचे एम एम शेख, अशोक आव्हाड ,आशिष सरपंच तलाठी, शिक्षीका श्रीमती लता बडक, हर्षिता बैरागी, सुनिता निकम, प्रतिभा पवार, गयास पटेल विनायक सोनवणे श्याम गोसावी असलम बागवान कैलास साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्राम विकास अधिकारी सुजाता गवई यांनी केली.

# जनावरे चोरणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील दोघांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** हरियाणामधील आरोपींशी हर्सूल कारागृहात ओळख झाल्यानंतर जनावरे चोरून त्याचे मास विक्री करणाऱ्या दोघांना गुन्हेशाखेने अटक केली. पाच महिन्यांपूर्वी २७ऑगस्टला छावणीतील गुरांच्या बाजारातून ३५हजारांची जनावरे चोरल्याचा तपास छावणी पोलिस व गुन्हेशाखा करत होते. त्याच वेळेस गुन्हेशाखेचे पीएसआय अमोल म्हस्के यांना खबऱ्याने जनावरे चोरांची माहिती दिली. त्यामुळे ११गुन्हे उघडकीस आले. वरील प्रकरणात बेगमपुरा, वाळूज, दौलताबाद, छावणी, हर्सूल वाळूज औद्योगिक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. हरियाणामधील मेवात येथील शेख हकीमोद्दीन अली शेर, शेकूल, सईद या तिघांनी शहरातील सहा पोलीस ठाण्याच्या हददीतून जनावरे चोरून ती रेकॉर्डवरचा गुन्हेगार शेख अब्दुल शेख रहीम उर्फ बब्बु यांच्या मार्फत सिल्लेखान्यातील कसाई





आसिफ कुरेशी यांच्याकडून कापून घेत होते. शहरातील मटन विक्रेत्यांना विकत असे. शेख हकीमोद्दीनची हर्सूल कारागृहात बब्बुशी तीन महिन्यापूर्वी ओळख झाली होती. हकीमोददीन जामिनावर बाहेर आल्यावर त्याने वरील गुन्हे केल्याची पोलिस तपासात उघंड झाली. वरील कारवाई पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अमोल म्हस्के यांनी पार पाडली. त्यांच्या पथकात पोलीस कर्मचारी सतीश जाधव , सुधाकर मिसाळ, संजयसिंग राजपूत नवनाथ खांडेकर, अजय चौधरी यांचा समावेश होता.

# ऊसतोड मजुरांना असाही मायेचा हात, लखमापूर येथे अनोखा उपक्रम

## प्रत्येक उसतोड कामगारांना जीवनावश्यक वस्तूचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**दिंडोरी :** सध्या कादवांचा साखर हंगाम सुरू झाला असून मोठ्या प्रमाणावर उसतोड मजुर उसतोडीसाठी उपलब्ध आहेत. व ते वेगवेगळ्या ठिकाणांतील उसतोड करून उसांची उपलब्धता निर्माण करून देत आहे. त्यामुळे या महत्वपूर्ण घटकांकडे मायेचा आधार देण्याची परंपरा लखमापुर येथील युवा उद्योजक, युवा शेतकरी निखिल नंदकुमार देशमुख व परिवार अनेक वर्षांपासून करीत आहे. दिंडोरी तालुक्यातील कादवा सहकारी साखर कारखाना हा तालुक्यांचा आर्थिक कणा मानला जातो. यासाठी नांदगाव, चाळीसगाव, जळगांव, नगर इ. ठिकाणीहून उसतोड कामगार आपल्या पोटांची खळगी भरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर येत असतात. मोठ्या थंडी गारट्यात मोठ्या कष्टाने उसतोड करून ते बैलगाडीने उस पुरवठा कारखान्याला करीत असतात. परंतु या कष्टकरी उसतोडी मजुरांना माय बाप मानणारे लखमापुर येथील युवा उद्योजक तसेच यूवा शेतकरी निखिल नंदकुमार देशमुख हे आपल्या आजोबांनी घालून दानांची परंपरा जपत आहे. आपल्या शेतात उसतोडीसाठी येणाऱ्या प्रत्येक उसतोड कामगारांना ते जीवनाआवश्यक वस्तूचे वाटप करीत असतात. त्यात धान्य, तांदूळ, डाळ, चहा, साखर, लहान मुलांना शालेय साहित्य, वस्त्र इ. दान करीत असतात. निखिल देशमुख यांनी ही परंपरा गेल्या पाच ते सहा वर्षांपासून जपत आहे. ही दानांची परंपरा जपत असतांना आम्ही कष्टकरी मजूर मायबापांना आमचे दैवत मानत असुन ते आमच्या साठी आदर्श आहे असेही निखिल देशमुख यांनी सांगितले. दान दिल्यानंतर त्या मजुरांच्या चेहऱ्यावरील हसू जीवनाला दिशा देणारे ठरत आहे.



हजारो शेतकरी वर्गामध्ये आमच्या उसतोड कामगारांची काळजी करणारे अत्यंत कमी शेतकरी असतात . परंतु लखमापुर येथील हे देशमुख कुटुंब दरवर्षी आम्हाला जे जीवना आवश्यक वस्तूचे दान करते . यांचा आम्हाला अतोनात आनंद देणारा असतो . **बाळू राठोड ( उसतोड कामगार )**

आम्ही बळीराजा शेतातील प्रत्येक मजुरांला आमचा आत्मा मानतो . त्याचे आम्ही काही देणे लागतो . याभावनाने आमचे आजोबा कै .साहेबराव तात्यासाहेब देशमुख यांनी २०१७ सालांपासुन ही मजुर दान योजना सुरू केली .परंतु आजोबांच्या निधनानंतर ही आम्ही वडील श्री नंदकुमार साहेबराव देशमुख यांच्या मार्गदरशनाखाली ही परंपरा कायम ठेवली असुन हंगामातील सुरुवातीस जे उसतोडीसाठी कामगार येतात त्यांना आम्ही ही दानांची परंपरा कायम ठेवली आहे . त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हा आम्हाला एकप्रकारे आनंददायी ठरते यांचा आम्हाला अभिमान आहे . **निखिल देशमुख, देशमुख एग्रो फार्म ( लखमापूर, ता .दिंडोरी शेतकरी )**

# सहा तासांत दरोडेखोर जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** पुणे शहरातून आलेले काही व्यक्ती उज्जैन येथे महाकालेश्वर येथून कार्यक्रमासंदर्भात आले असता तेथून दर्शन घेऊन पुणे परतीला जात असताना आर्वी जवळ दरोडेखोराचा हल्ल्यात एक व्यक्ती गंभीर जखमी आहे त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे हेमंत पाटील साहेब व त्यांची टीम ताबडतोब रवाना झाली व सहा तासाच्या आत ४ लाखाच्या मुद्देमाल व दमदार शस्त्र सहित आरोपी अटकेत व मा. पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्ह्याचे हेमंत पाटील यांच्या कामगिरीबद्दल यांना दहा हजारचे बक्षीस दिले. राकेश अमरनाथ कदम, वय 45 वर्ष, अप्पा चौक, वाघोली पुणे हे त्यांच्या मित्रांसद उज्जैन येथुन महाकालेश्वराचे दर्शन येवुन पुणे येथे जात असताना धुळे जिल्हा हदीत आर्वी गावाच्या पुढे बालाजी भारत पेट्रोलपंपाजवळ त्यांच्या ताब्यातील सुजूकी बोलेरोमधेच आराम करण्यासाठी थांबले असताना रात्री 2 ते 3 वाजेच्या सुमारास 6 अज्ञात आरोपीतांनी त्यांच्या गाडीच्या काचेवर दगड मारुन काचा फोडुन राकेश अमरनाथ कदम व त्यांच्या तीन मित्रांना चाकुचा धाक दाखवुन त्यांचे ताब्यातील रोख रक्कम, मोबाईल फोन व इतर साहीत्य असा 25,500 / - रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरीने चोरुन नेलेबाबत श्री राकेश अमरनाथ कदम यांनी फिर्याद दिल्याने धुळे तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे सदर गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने मा . पोलीस अधीक्षक श्री संजय बारकुंड साहेब यांचे आदेशाने सदर गुन्याचा समांतर तपास स्थानीक गुन्हे शाखेकडुन सुरु असताना पोलीस निरीक्षक श्री हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदरामार्फत माहिती मिळाली की, लाल काळ्या रंगाच्या स्विफ्ट कार क्रमांक MH 14 BX1573 मधून आलेल्या इसमांनी सदर गुन्हा केला असुन गुन्हा करुन सदर इसम शिरपुर भावाच्या दिशेने गेले आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक श्री हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखेचे पथक तात्काळ शिरपुर कडे रवाना झाले . सदर आरोपीतांचा शोध घेत असताना स्विफ्ट कार हि मध्यप्रदेश राज्यात सेंधवा कडे जात असताना स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने हाडाखेड गावाजवळ सदर कारला अडवुन कारमधील तीन इसमांना ताब्यात घेवून त्यांचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांचे नाव गाव राजेश परशुराम राठोड, वय 31 वर्ष, रा . मांजरी तांडा, ता . मुखेड, जि . नांदेड, जगदिश शिवाजी पवार, वय 19 वर्ष, रा . कमलेवाडी ता मुखेड, जि . नांदेड, योगेश शंकर पवार, वय 34 वर्ष, रा बेळी, ता . मुखेड जि . नांदेड, असे सांगीतले . सदर इसमांना ताब्यात घेवून विचारपूस करता त्यांनी सदर गुन्हा त्यांचे साथीदार नामे, अंकुश डेंम्पु पवार ,सलीम, छोटु सर्व रा . औरंगाबाद यांचेसह मिळून केला असल्याचे कबुल करून गुन्हा केल्यानंतर आरोपी क्र . ४ ते ६ हे शिरपूर येथून खाजगी बसने औरंगाबाद येथे गेले असल्याचे सांगितले आहे . आरोपीतांचे ताब्यातून काही वर्णनाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे 3,00,000 / - रुपये किंमतीची स्विफ्ट कार,1,00,000 / - रुपये किंमतीच्या २ सोन्याच्या अंगठया, 26000 / - रुपये किंमतीचे एक गावठी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत काडतुस, 20,000 / - रुपये किंमतीचे चार मोबाईल फोन,8300 / - रुपये रोख रक्कम, 200 / - रुपये किमतीचे गुन्हा करण्यासाठी वापरण्यात येणारे 2 चाकु असा एकुल 4 , 54 , 500 / - रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संजय बास्कुड साहेब, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे साहेब यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानीक गुन्हे शाखा धुळेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, योगेश राऊत, बाळासाहेब सुर्यवंशी, संजय पाटील, अशोक पाटील, महेंद्र, सपकाळ, अमोल जाधव, गुलाब पाटील अशानी केली आहे.

# जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन

**कन्नड :** जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ कन्नड व शिक्षणमहर्षी स्व के के जाधवसर सेवाभावी प्रतिष्ठान कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय बनशेंद्रा ता कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे दि 12 जानेवारी 2023 रोजी सकाळी 9 वाजता राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व युवकदिन महोत्सव साजरा होणार असून त्या निमित्ताने जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन इयत्ता 5वी ते 10 वीच्या विद्यार्थ्यांसाठी केले असून स्पर्धेचा विषयः- वाढत्या भौतिक सोयी सुविधा मानवास तारक की मारक ? असा आहे. स्पर्धेचे नियम 1)एका शाळेतून दोन विद्यार्थ्यांचा एक संघ असावा. अनुकूल बाजूवर एक व प्रतिकूल बाजूवर एक असा दोन विद्यार्थ्यांचा संघ असेल.2)स्पर्धेचा वेळ पाच मिनिटांचा असेल.3)स्पर्धा फीस 20 रु असेल.4) अनुकूल व प्रतिकूल अशा दोन बाजू मांडणारा संघ पूर्ण समजला जाईल ,सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र असेल.
बक्षीस स्वरूप -संघीक-ढाल, वैयक्तिक प्रथम 5001रु स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र वैयक्तिक द्वितीय-3501रु स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र तृतीय-2001रु स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र उत्तेजनार्थ बक्षीस संख्या 5 प्रत्येकी 501 रु स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र बक्षीस वितरण 12 जानेवारी2023 रोजी स्पर्धा संपल्यानंतर कार्यक्रम स्थळी मान्यवरांच्या हस्ते होईल. स्पर्धेसाठी जिल्ह्यातील शाळांनी सहभागी व्हावे असे आव्हान-जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव व शिक्षण महर्षी स्व के. के. जाधव सेवाभावी प्रतिष्ठानचे संस्थापक/अध्यक्ष सागर कृष्णाराव जाधव व विद्यालयाचे सर्व मुख्याध्यापक बाळासाहेब निकम, हेमराज खोब्रागडे, आबासाहेब चव्हाण, रवींद्र नीळ सांस्कृतिक विभाग प्रमुख विष्णू भोसले, प्रदीप सनंसे, विलास लोखंडे, योगेश जंजाळ यांनी केले आहे.

# ऐश्वर्या आणि सुचित्रा कुंचमवार या वर्षीचे "द्रोणागिरी भूषण" पुरस्काराचे मानकरी

आधुनिक केसरी न्यूज



**रायगड :** पाच दिवसीय चालणाऱ्या द्रोणागिरी युवा महोत्सवाची सुरुवात दिनांक २० डिसेंबर २०२२ यादिवशी झाली. आपापल्या क्षेत्रात उज्वल कामगिरी करणाऱ्या ३५ जणांना यावर्षीचा द्रोणागिरी भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या यादीमध्ये सुचित्रा अशोक कुंचमवार आणि त्यांची मुलगी ऐश्वर्या अशोक कुंचमवार यांना द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत, माजी आमदार मनोहर भोईर, तानाजी मालूसुरे यांचे वंशज अनिल मालुसरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. द्रोणागिरी,उरण. जि.रायगड द्रोणागिरी युवा महोत्सवाच्या २२ वर्षाच्या कारकिर्दीत असे प्रथमच घडले आहे की एकाच वर्षी एकाच घरातील दोन जणांना द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अविरत सातत्यपूर्ण चालणारे लेखन आणि ऐश्वर्याच्या दैदिप्यमान शैक्षणिक यशाच्या वाटचालीने साहित्यिका आणि ऐश्वर्याचे शैक्षणिक विशेष प्राविण्य या गटामधील पुरस्कारावर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आणि द्रोणागिरी युवा महोत्सवाच्या पुरस्काराच्या यादीत या मायलेकीने आपल्या नावावर हा विक्रम (रेकॉर्ड) प्रस्थापित केला. तसेच आर्य वैश्य समाजातील या दोघीही या पुरस्काराच्या प्रथम मानकरी आहेत. त्याबद्दल सर्वत्र त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# मराठवाड्याची स्टार टेनिस खेळाडू मृण्मयी जोशीची राज्यस्तरीय टेनिस स्पर्धेसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** 17 वर्षाखालील गटातून औरंगाबाद विभागातून प्रथम क्रमांक मिळाल्यामुळे एसबीओए शाळेतील मृण्मयी मनोज जोशीची राज्यस्तरीय टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे त्यासाठी मुख्याध्यापीका शुभदा पुरंदरे, क्रीडा शिक्षिका योगिता मानवतकर, व क्रीडा शिक्षक भावसार सर यांनी कौतुक केले. ही स्पर्धा लातूर येथे 29.व 30 डिसेंबर रोजी होणार आहे, मृण्मयी जोशी ही इंडुरंस टेनिस सेंटर येथे लहान पणापासूनच टेनिस शिकत आहे तसेच बडवे ग्रुप ऑफ इंजिनीरिंगच्या स्पोर्ट इंडिया खेळाला प्रोत्साहन देणाऱ्या संस्थेची ती स्टार प्रचारक आहे. सध्या ती फक्त 15 वर्षाची असून तिला येत्या तीन वर्षामध्ये अमेरिका व युरोपला टेनिस ट्रेनिंग व टूर्नामेंटसाठी जायचं आहे. या टुर्नामेंट खेळण्यासाठी तेथे जाणे, येणे त्या ठिकाणी रहाणे व खेळाचे साहित्य फिटनेससाठी असा खूप खर्च येतो व यासाठी तिला आर्थिक पाठबळाची खूप आवश्यकता आहे. मृण्मयीला लहानपणा पासूनच टेनिसचे वेड होते व तिच्या या खेळाच्या कौशल्यामूळे तिच्या आई-वडीलांनी टेनिस हेच तिचे करियर आहे हे लक्षात घेवून तिला पुर्ण पाठिंबा देण्याचे ठरवीले व त्यांनी आपले संपूर्ण लक्ष तिच्या खेळावर नियंत्रीत केले व तिला वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये खेळण्यासाठी उतरविले, मृण्मयीने आत्तापर्यंत नेपाळ येथे दोन स्पर्धा, श्रीलंका येथे 2 स्पर्धा खेळल्या आहेत. ती मराठवाड्यातील पहिली मूलगी आहे. जिला वयोगट 18 वर्षाच्या वयोगटातील जागतिक मानकन मिळाले आहे, तिचा जागतिक रँक 3558 आहे, आशियन रँक 92 आहे. भारतात 60 वा रँक आहे तर महाराष्ट्रात 8 व मराठवाड्यात प्रथम क्रमांक आहे, आता पर्यंत तिने 160 टूर्नामेंट भारतात व आशीयात खेळले आहेत.
तीचा आजपर्यंतचा यशस्वीतेचा ग्राफ अचंबित करणारा असाच आहे व लवकरच ती भारताचे प्रतिनिधित्व करेल



यात कोणतीही शंका नाही, आजच तिच्या खेळाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तराचा आहे, तिला अजून चांगल्या कोचची गरज आहे तिला आर्थिक पाठबळ आवश्यक आहे त्याकरिता दानशूर अर्थ दात्यांनी पुढे येवून तिला मदत करणे गरजेचे आहे म्हणजे खूप लवकरच ती या खेळात संभाजीनगरचे नाव जागतीक स्तरावर रोशन करेल असे तिच्या आई-वडिलांनी सांगीतले. तिचे वडील डॉ. मनोज जोशी हे औरंगाबाद येथील प्रसिद्ध आयुर्वेद तज्ज्ञ आहेत.


# शेतकऱ्यांनी रब्बी पीक स्पर्धेत सहभागी व्हावे : तालुका कृषी अधिकारी वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुका कृषी विभागाच्या



वतीने तालुका कृषी अधिकारी एस.जी. वाघ यांनी शेतकऱ्यांना रब्बी पीक स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिकाधिक पिकांचे उत्पादन घेण्यासाठी स्पर्धात्मक वातावरण निर्माण करून दुय्यम तसेच कडधान्य,तृणधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादन वाढण्यासाठी रब्बी हंगाम पीक स्पर्धेत अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, तालुका कृषी अधिकायाबरोबर जिल्हा कृषी अधिक्षक बाळासाहेब तौर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये या आधी केले आहे.
पीक स्पर्धेसाठी सोयगाव तालुक्यात गहू, हरभरा अशा दोन पिकाची निवड केली आहे. या पीक स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावयाचा असल्यास लेखी अर्ज करणे बंधनकारक राहील. तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पिक स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख यांनी केले आहे. सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र पीकनिहाय ३०० रुपये प्रवेश शुल्क राहील. सोयगांव तालुकास्तरावर स्पर्धा आयोजनासाठी सर्वसाधारण गटासाठी किमान १०, आदिवासी गटासाठी किमान ५ यापेक्षा कमी प्रवेश अर्ज असल्यास पीकस्पर्धा रद्द करण्यात येऊन प्रवेश शुल्क परत देण्यात येईल. पीकस्पर्धेचा निकाल तालुकास्तर, जिल्हास्तर राज्यस्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने घेण्यात येईल. अशा पद्धतीने पिकस्पर्धा तालुकास्तरीय, जिल्हा स्तरीय व राज्य स्तरीय करण्यात आली आहे. स्पर्धेतील पीकनिहाय पहिल्या तीन पीक स्पर्धेसाठी व सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकापातळीवर पहिले ५ हजार, दुसरे ३ हजार तर तिसरे २ हजार रुपयांचे बक्षिस राहील, तर जिल्हा पातळीवर पहिले १० हजार, दुसरे ७ हजार तर तिसरे बक्षिस ५ हजार रुपये असेल. तसेच राज्य पातळीवर पहिले ५० हजार, दुसरे ४० हजार तर तिसरे ३० हजार रुपये बक्षिस राहील. हंगामातील पिक स्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम 31 डिसेंबर 2022 आहे. पिकस्पर्धेसाठी तालुक्यातील पिकाचे क्षेत्र १ हजार हेक्टर असावे व लाभार्थी शेतकऱ्यांचे पिकाचे किमान क्षेत्र ४० आर असावे. अश्या प्रकारे रब्बी हंगामासाठी सोयगाव तालुक्यात पिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून रब्बी हंगाम पीकस्पर्धेसाठी ३१ डिसेंबर,२०२२ ही अंतिम तारीख आहे. पिक स्पर्धेसाठी शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी सोयगाव कृषी विभागाशी संपर्क साधावा असे आवाहनही कृषी सहाय्यक मानसिंग भोळे व कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख यांनी सोयगाव परिसरातील शेतकऱ्यांना केले आहे.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in